रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २५०
www.ramprahar.com
गुरुवार, ३० मार्च २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आमदार जितेंद्र आव्हाडांच्या माजी अंगरक्षकाची आत्महत्या/२
अल्पवयीन भाचीवर अत्याचार; आरोपी मामा अटकेत/३
कर्णधार रोहित शर्माने मानले मुंबई इंडियन्सचे आभार/८

## ‘यूपीआय पेमेंट्सबाबत ग्राहकांनी चिंता करू नये’



**नवी दिल्ली :** यूपीआय पेमेंट्सवर १ एप्रिलपासून शुल्क लागणार असल्याचे आदेश समोर आल्यानंतर देशभरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सरकारने यावर स्पष्टीकरण दिले असून ग्राहकांनी चिंता करू नये, असे आवाहन केले आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) परिपत्रकात २००० रुपयांपेक्षा जास्त पेमेंटसाठी १.१ टक्के शुल्क आकारले जाईल, असे म्हटले आहे. यूपीआयद्वारे व्यापारी व्यवहार प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स (पीपीआय) शुल्क लागू होणार आहे. एनपीसीआयने आपल्या परिपत्रकात म्हटले आहे की, या बदलाचा ग्राहकांवर कोणताही परिणाम होणार नाही. ग्राहकांना कोणतेही अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. फक्त पीपीआय वॉलेटवर शुल्क आकारले जाईल, जे व्यापाऱ्याला भरावे लागणार आहे. ग्राहकांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

# मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर काँक्रीटीकरणाचे आज भूमिपूजन

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सोहळा; मंत्री रवींद्र चव्हाण, उदय सामंत यांची विशेष उपस्थिती







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकणासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन गुरुवारी (दि. ३०) सकाळी ८ वाजता केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते खारपाडा टोल प्लाझा येथे होणार आहे.

या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री रवींद्र चव्हाण, राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील काही टप्प्यांमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडत असल्याने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि दरवर्षी डांबरीकरणावर होणारा कोट्यवधींचा खर्च टाळण्यासाठी काँक्रीटीकरणाची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी करून तातडीने निधी मंजूर केला. त्या अनुषंगाने या महामार्गावरील पनवेल ते कासू ४२.३० किमी रस्त्याचे काँक्रीटीकरण, राजेवाडी फाटा ते वरंध गाव या १३ किमी रस्त्याचे काँक्रीटीकरणासह दुपदरीकरण तसेच वरंध गाव ते पुणे जिल्हा हद्द या ८.६० किमी रस्त्याच्या काँक्रीटीकरणासह दुपदरीकरण करणे अशा एकूण ६४ किमी रस्त्याचे काँक्रीटीकरण होणार असून यासाठी ४१४.६८ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे.

या समारंभाला नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.

# सावरकर गौरव यात्रा २ एप्रिलला पनवेलमध्ये

### भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची माहिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे व त्यागाचे स्मरण करून देण्यासाठी राज्यभरात गुरुवार (दि. ३०)पासून भाजप आणि शिवसेनेतर्फे सावरकर गौरव यात्रा काढण्यात येणार आहे. त्यानुसार २ एप्रिलला पनवेलमध्ये ही गौरव यात्रा होणार असल्याची माहिती भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. २९) पत्रकार परिषदेत दिली.

पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, प्रवक्ते प्रकाश बिनेदार, जिल्हा विस्तारक अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, **(पान २ वर..)**

### ‘त्यांना’ त्यागाचे महत्त्व काय कळणार?

इंग्रजांचा छळ सहन करीत असतानाही स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सर्जनशील कवित्व आणि बंडखोर क्रांतिकारकत्व तसूभरही कमी झाले नव्हते. स्वातंत्र्यलढ्यासाठी सावरकरांनी अनेक गोष्टींचा त्याग केला. राष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अवमान करण्याचे वारंवार काम राहुल गांधी करीत आहेत. राहुल गांधी कौटुंबिक राजकारण व सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले. त्यामुळे त्यांना देशासाठी केलेल्या त्यागाचे महत्त्व काय कळणार? असे पनवेल शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी या वेळी म्हटले.

# खासदार गिरीश बापट यांचे निधन

### सर्वपक्षीय नेत्यांनी वाहिली आदरांजली



**पुणे : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते व पुण्याचे खासदार गिरीश बापट यांचे बुधवारी (दि. २९) वयाच्या ७२व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर पंतप्रधानांसह सर्वच राजकीय पक्षांतील नेत्यांनी आदरांजली वाहिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत घडलेल्या गिरीशभाऊंनी कायमच समाजकार्य तसेच विकासाचे राजकारण केले. गिरीश बापट गेल्या दीड वर्षापासून आजाराशी झुंजत होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. गिरीशभाऊंच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नात असा परिवार आहे.

**“ गिरीश बापट यांनी महाराष्ट्र भाजपच्या उभारणीत आणि त्यानंतर पक्ष बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. लोककल्याणाचे प्रश्न मांडणारे ते प्रभावी नेते होते. आपल्या कार्याचा वेगळा ठसा त्यांनी उमटवला. त्यांचे कार्य अनेकांना प्रेरणा देणारे ठरेल याबाबत माझ्या मनात शंका नाही.**

**-नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

**“ भाजपचे पुण्यातील खासदार आणि ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांच्या निधनामुळे राजकारणातील एक सर्वसमावेशक नेतृत्व हरपले आहे. दुर्धर आजाराशी झुंजत असतानादेखील ते आपल्या पक्षाला ऊर्जा देण्याचे काम करीत होते. मनमिळावू आणि दिलदार नेता आज आपल्यातून गेला.**

**-एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री

**ज्येष्ठ नेते व खासदार गिरीश बापट यांच्या निधनाने जमिनीशी नाळ असलेले उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे. विकास हाच त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. पक्षनिष्ठ, पण पक्षापलीकडे जिव्हाळ्याचे संबंध जोपासणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे.**

**-देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री



# खासदार गिरीश बापट यांच्या निधनावर सर्वपक्षीयांकडून शोक व्यक्त



**पुणे : प्रतिनिधी**

भाजपाचे पुण्यातील खासदार गिरीश बापट यांचे ७२व्या वर्षी निधन झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांची प्राणज्योत बुधवारी (दि.२९) मालवली. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधानानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेपासून सर्वच राजकीय पक्षांतील नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

**लोकप्रिय नेता गमावला**

लोकप्रिय खासदार गिरीश बापट यांच्या निधनाचे वृत्त समजून अतिशय दु:ख झाले. आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत गिरीश बापट यांनी संसद सदस्य, राज्य विधानसभेचे सदस्य, कॅबिनेट मंत्री, संसदीय समित्यांचे सदस्य यांसह विविध पदांवर उल्लेखनीय कार्य केले. कामगार संघटनेच्या माध्यमातून राजकारणात आलेले गिरीश बापट हे कुशल संघटक होते. त्यांचा जनसंपर्क अतिशय व्यापक होता. राजकारणात ते अजातशत्रू होते. त्यांच्या निधनामुळे राज्याने एक लोकप्रिय नेता व अनुभवी संसदपटू गमावला आहे, असे राज्यपाल बैस यांनी आपल्या शोकासंदेशामध्ये म्हटले आहे.

**सुसंस्कृत चेहरा हरपला**

राज्याचे माजी मंत्री, विद्यमान खासदार गिरीश बापट यांचे निधन हे पुणे जिल्ह्यातल्या आम्हा सर्वपक्षीय राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का आहे, अशी भावना अजित पवार यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राचे सर्वसमावेशक, सुसंस्कृत राजकारणाचा चेहरा म्हणून गिरीशभाऊंकडे पाहीले जायचे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेल्या गिरीशभाऊंनी जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, पक्षभेदांच्या भिंती ओलांडून समाजकार्य, विकासाचं राजकारण केलं, अशी भावना अजित पवार यांनी व्यक्त केली. आजाराशी ते निर्धारने लढत होते. बरे होऊन सार्वजनिक जीवनात ते पुन्हा सक्रीय होतील, हा विश्वास आम्हा सगळ्यांना होता. तो विश्वास खोटा ठरला, अशी भावना विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केली.

**मुरब्बी राजकारणी हरपला**

भाजपा खासदार गिरीश बापट यांचं काही वेळापूर्वीच पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रूग्णालयात निधन झालं. त्यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून खालावली होती. काही वेळापूर्वीच त्यांच्या निधनाचं वृत्त समोर आल; आहे. भाजपातले एक मुरब्बी राजकारणी अशी त्यांची ओळख होती. त्यांचा पुण्यातला जनसंपर्क हा प्रचंड मोठा होता. सर्व पक्षीय नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. त्यांच्या जाण्याने आता भाजपातला पुण्यातला मोठा आधार गेला आहे असं म्हटले तरी काहीही वावगं ठरणार नाही. भाजपात त्यांनी नगरसेवक ते खासदार अशी पदे सांभाळली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ट्वीट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

गिरीश बापट हे पुणे शहराच्या राजकारणात गेली ४० वर्ष सक्रीय होते. ३५ वर्ष आम्ही पुण्यात बरोबर काम केलं. पुणे महापालिका, विधानसभा आणि लोकसभेत त्यांन केलेलं काम अतिशय उल्लेखनीय होतं. पुणेकरांच्या सुख-दुख:त सहभागी होणारा नेता आज काळाच्या पडद्याआड केला, असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अंकुश काकडे यांनी गिरीश बापट यांना आदरांजली वाहिली.

**पुणे पोरकं झाले**

भाजपा ज्येष्ठ नेते आणि पक्षनिष्ठ व्यक्तिमत्त्व खासदार गिरीश बापट यांचं निधन अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने बापट कुटुंबियांबरोबरच भाजपाच्या परिवारावरदेखील दुःखाचा डोंगर कोसळला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, ते नगरसेवक, आमदार, खासदार आणि राज्याचे मंत्री अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी उत्तमरित्या पार पाडल्या. गिरीश बापट यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने 'पुण्याची ताकद गिरीश बापट' ही ओळख निर्माण केली. आज त्यांच्या जाण्याने पुणे पोरकं झालं आहे, आमचा मार्गदर्शक हरपला आहे, अशी प्रतिक्रिया पुण्याचे पालक मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

**लोकप्रिय लोकनेता हरपला**

गिरीश बापट यांच्या निधनाची बातमी आताच ऐकली. ही अतिशय दुख:द बातमी आहे. खूप वाईट वाटलं. गिरीश बापट आणि मी संसदेत बरोबरीने काम केलं. संसदेच्या एस्टीमेट समितीचे ते अध्यक्ष होते आणि मी त्या समितीचा सदस्य होतो. त्यांचे आणि आमचे सलोख्याचे संबंध होतो. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ होता. लोकप्रिय लोकनेता असं त्यांचं वर्णन करता येईल, असे खासदार विनायक राऊत म्हणाले.

**दिलखुलास व्यक्तिमत्व निघून जाणं वेदनादायी**

आज मी अतिशय जवळचा मित्र गमावला आहे. आम्ही अनेक वर्ष बरोबर काम केलं. त्यांच्या बरोबरच्य अनेक आठवणी आहेत. गिरीश बापट एक दिलखुलास व्यक्तिमत्व होतं. त्यांचं असं आपल्यातून निघून जाणं वेदनादायी आहे. त्यांच्या निधनानं भाजपाची खूप मोठी हानी झाली आहे, अशी भावना गिरीश महाजन यांनी व्यक्त केली.

**गुरुतुल्य मार्गदर्शक हरपले**

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, खासदार गिरीश बापट यांच्या निधनाची बातमी आली. पुणे जिल्ह्यातील एक प्रखर राष्ट्राभिमानी नेता आपण गमावला. माझ्या राजकीय जीवनात बापट यांनी कायम ताकद दिली. २०१४ ते २०१९ या काळात पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील विकासकामांसाठी कायम सकारात्मक भूमिका घेतली. त्यांच्या जाण्याने माझ्या राजकीय वाटचालीतील गुरूतुल्य मार्गदर्शक हरवलं आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी दिली.

**पुणे चांगल्या नेतृत्वाला मुकलं**

गिरीश बापट यांच्या निधनानंतर कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली. राजकीय स्तर कसा टिकवायचा हे बापटांकडून शिकावं. त्यांची उणीव कोणीही भरून काढू शकत नाही. पुणे आज चांगल्या नेतृत्वाला मुकलं अशी भावना धंगेकरांनी व्यक्त केली.



## गिरीश बापट यांचा साधेपणा प्रेरणा देणारा होता-आमदार प्रशांत ठाकूर

*भाजपचे पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांचे बुधवारी (दि. २९) सकाळी पुण्यात निधन झाले. वयाच्या ७२व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. माजी मंत्री आणि भाजपचे खासदार गिरीश बापट यांचे निधन झाल्याचे वृत्त वेदनादायी आहे. रायगड जिल्हा भाजपच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. गिरीश बापट यांच्या जाण्याने मोठी हानी झाली आहे. पुण्यात आपल्या कार्यामुळे त्यांनी भाजप रुजवली आणि वाढवली. त्याचबरोबर महाराष्ट्रात भाजप वाढवण्यात त्यांचा मोठा हातभार होता. त्यांच्या जाण्याने भाजपची अपरिमित हानी झाली आहे. वेगवेगळ्या बैठकांमधून त्यांच्याशी भेट झाली आणि त्यांचा साधेपणा प्रेरणा देणारा होता. भाजपच्या कार्यकर्त्यांनी कसे काम करावे हे त्यांच्या कृतीतून नेहमी दिसून आले, अशा शब्दात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी गिरीश बापट यांना श्रद्धांजली वाहिली.*

# आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या माजी अंगरक्षकाची आत्महत्या

**ठाणे : प्रतिनिधी**

आमदार जितेंद्र आव्हाड यांचे माजी अंगरक्षक पोलीस हवालदार वैभव कदम यांनी निलजे ते तळोजा या रेल्वे मार्गिकेदरम्यान रेल्वेगाडीखाली येऊन आत्महत्या केल्याचा प्रकार बुधवारी उघडकीस आला आहे. ते सध्या मुंबई पोलीस दलात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. जितेंद्र आव्हाड हे मंत्री असताना ते आव्हाड यांचे अंगरक्षक होते. त्यावेळी अनंत करमुसे यांना मारहाण केल्याप्रकरणी त्यांना ठाणे पोलिसांनी अटकही केली होती.



वैभव कदम हे बुधवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास निलजे ते तळोजा या रेल्वे मार्गिकेवर आले. त्यावेळी त्यांनी रेल्वेगाडीखाली येऊन आत्महत्या केली. वैभव यांनी आत्महत्येपूर्वी कोणतीही चिठ्ठी लिहीली नव्हती. त्यामुळे त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्यापही कळू शकले नाही. त्यांच्या आत्महत्येची नोंद ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आव्हाड हे मंत्री असताना त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी अनंत करमुसे यांना मारहाण केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या मारहाणीप्रकरणात कदम यांना अटक झाली होती. त्यानंतर ते जामीनावर सुटले होते. कदम हे सध्या मुंबई पोलीस दलात हवालदार म्हणून एसपीयु शाखेत कार्यरत होते.

## घातपाताचा संशय : मोहीत कंबोज

*महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मंत्री जितेंद्र आव्हाड यांचे अंगरक्षक म्हणून कॉन्स्टेबल वैभव कदम यांची नियुक्ती होती. अभियंते अनंत करमुसे यांनी आव्हाड यांच्याविरोधात आक्षेपार्ह पोस्ट केल्याचा राग बाळगत त्यांना मारहाण झाली होती. या मारहाणीत वैभव कदम यांनाही आरोपी करण्यात आलं होतं. मात्र वैभव कदम आता या प्रकरणात माफीचा साक्षीदार व्हायचं ठरवलं होतं, त्यामुळे त्यांचा घातपात झाला असावा का, असा संशय भाजप नेते मोहित कंबोज यांनी व्यक्त केलाय. या प्रकरणी एफआयआर दाखल करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.*

# रायगड-अलिबाग कुटुंब न्यायालय कार्यकक्षेत विस्तार

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड-अलिबाग येथील कुटुंब न्यायालयाच्या कार्याचा विस्तार पेण-मुरूड तालुक्याच्या क्षेत्रापर्यंत करण्यात आला आहे. यामुळे या क्षेत्रातील रहिवाशांची कौंटुबिक प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यास सहकार्य लाभणार आहे.

राज्य शासनाने उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, रायगड-अलिबाग कुटुंब न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राच्या स्थानिक मर्यादा, पेण व मुरूड तालुक्याच्या संपूर्ण क्षेत्रापर्यंत वाढविल्या आहेत. या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा अलिबाग नगरपालिका क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष तसेच तालुक्याच्या संपूर्ण स्थानिक सीमांतर्गत क्षेत्राशी तसेच मुरूड तालुक्याच्या संपूर्ण स्थानिक सीमांतर्गत क्षेत्राशी समकक्ष असतील, असे विधी व न्याय विभागाने अधिसूचनेद्वारा कळविले आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर धाडसी चोरी

## साडेतीनशे तोळे सोने आणि पाच लाखाची रक्कम लंपास

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर खालापूर हद्दीत जबरी चोरीची घटना घडली असून जवळपास साडेतीनशे तोळे सोने आणि पाच लाख पंधरा हजाराची रक्कम चोरट्याने हातोहात लंपास केली आहे.

मुंबई येथील सुवर्णकार महेंद्र नागराज मालू (वय ३९) हे मंगळवारी (२८ मार्च) हैदराबाद ते मुंबई असा ऑरेंज ट्रव्हल्स कंपनीची बस क्रमांक एम.पी-०९-एफ.अे-९३०८ यामधुन प्रवास करित होते. बस सकाळी सव्वा नऊच्या सुमारास मौजे ठाणेन्हावे गावचे हददीत पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील फूडमॉल जवळील हॉटेल वाहनतळात थांबली होती. महेंद्र चहा पिण्याकरिता बसमधून खाली उतरुन परत येईपर्यत दोन अनोळखी इसमांनी बसच्या सिटवर ठेवलेली त्यांची सॅक कटरच्या सहाय्याने कापून त्यामधील २ कोटी ३ लाख रुपये किमतीचे सोन्याचे तयार दागिने आणि ५ लाख १५ हजार रोख रक्कम अशी २ कोटी ८ लाख १५ हजार रुपये किमंतीची मालमत्ता चोरून नेली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरोधात भा.दं.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि राकेश कदम करीत आहेत.

# महिला, शाळा, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्थांचा शुक्रवारी स्वच्छता मशाल मार्च

**पनवेल : प्रतिनिधी**

| अ.क्र. | प्रभागसमिती | प्रभाग क्र. | स्वच्छता मशाल मार्च व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अ(खारघर) | १ ते ६ | शिल्प चौक ते उत्सव चौक |
| २. | ब (कळंबोली) | ७ते १०,१५,१६ | कळंबोली बस स्टॉप ते पोलिस निवारा |
| ३ | क(कामोठे) | ११ ते १४ | दि.बा पाटील मैदान ते पोलिस स्टेशन मैदान |
| ४. | ड (पनवेल) | १७ ते २० | महानगरपालिका मुख्यालय ते वडाळा तलाव |

महिलांच्या नेतृत्त्वाखालील स्वच्छतेमध्ये झालेले संक्रमण साजरे करण्यासाठी शुक्रवारी (दि. ३१) पनवेल महापालिका हद्दीत चारही प्रभागांमध्ये 'स्वच्छता मशाल मार्च' काढण्यात येणार आहे. यामध्ये महिला, शाळा, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्थांना सामील होण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान संपुर्ण राज्यभरात ७ मार्च ते ३१ मार्च दरम्यान राबविले जात आहे. या कालावधीत महिलांचा स्वच्छतेमधील सहभाग व त्यांचे स्वच्छतेमधील नेतृत्त्व वृद्धींगत करण्यासाठी 'स्वच्छोत्सव - २०२३' अभियान महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. आयुक्त गणेश देशमुख यांनी या ३१ मार्च रोजी चारही प्रभागांमध्ये होणाऱ्या 'स्वच्छता मशाल मार्च' मध्ये महिला, शाळा,महिला बचत गट, स्वयंसेवी संस्थांना सामील होण्याचे महापालिकेच्यावतीने आवाहन केले आहे.

मोहिमेचा मुख्य उद्देश महिलांच्या स्वच्छतेमधील सहभागापासून ते महिलांच्या नेतृत्त्वाखालील स्वच्छतेमध्ये झालेले संक्रमण साजरे करणे हा आहे. सदर अभियानामध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळा. कॉलेज, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट इत्यादींनी दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी सकाळी ७.३० वाजता पनवेल महानगरपालिकेद्वारे प्रभागसमिती निहाय निघणाऱ्या'स्वच्छोत्सव २०२३' अंतर्गत 'स्वच्छता मशाल मार्च'मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

## सावरकर गौरव यात्रा २ एप्रिलला पनवेलमध्ये

भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, महिला मोर्चा शहराध्यक्ष वर्षा नाईक, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सुहासिनी केकाणे, सपना पाटील, अंजली इनामदार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे सांगितले की, राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघातून सावरकर गौरव यात्रा प्रवास करणार आहे. ६ एप्रिल रोजी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनी या यात्रेचा समारोप होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे तसेच भाजप-शिवसेनेचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी या यात्रेत सहभागी होणार आहेत. त्या अनुषंगाने २ एप्रिल रोजी खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल, पनवेल या भागात ही यात्रा गौरवरथाचा सहभाग घेऊन होणार आहे.

राहुल गांधी व काँग्रेसच्या अन्य नेत्यांकडून स्वातंत्र्यवीर सावरकरांचा वारंवार अवमान केला जात आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसकडून स्वातंत्र्यवीर सावरकरांचा वारंवार होणारा अपमान सत्ता टिकवण्यासाठी निमूटपणे सहन केला तसेच सत्तेसाठी हिंदुत्वाचा विचार सोडून दिला. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करणाऱ्या मणिशंकर अय्यर यांच्या प्रतिमेला रस्त्यावर उतरून जोडे मारले होते. तशी हिंमत उद्धव ठाकरेंनी दाखवायला हवी होती, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी म्हटले.

सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या उद्दिष्टाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश पुढे चालला आहे. आपल्या संस्कृतीचे महत्त्व जगात आहे. चीनला टक्कर देण्याची ताकद आपल्याकडे आहे. आपल्या देशाचा गौरव जगभरात होत असताना काँग्रेस नेते राहुल गांधी मात्र परदेशात आपल्या देशाच्या विरोधात बोलतात. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी देशासाठी संघर्ष केला. दोन जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा, अंदमान येथे तुरुंगवास भोगला. संघर्ष केला.

त्यांच्या जाज्वल देशभक्तीला कुणीच चॅलेंज करू शकत नाही, मात्र त्यांची देशभक्ती आणि कार्याविषयी विरोधकांकडून जाणीवपूर्वक संशय निर्माण केला जात आहे. ते हाणून पाडून महाराष्ट्राची आणि देशाची अस्मिता असणारे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्त्व अधिक वृद्धिंगत करण्यासाठी या गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध संस्था, संघटना, सार्वजनिक उत्सव मंडळ, पत्रकार, नागरिकांनीही सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

# प्रवाशाला लुटले

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी टर्मिनसहून सोमवारी रात्री सुटणाऱ्या हावडा मेलमध्ये तीन फेरीवाल्यांनी संगनमत, दमदाटी करुन करुन झारखंडमधील एका प्रवाशाला लुटले.

या प्रवाशाची गावी जाण्यासाठी जमवलेली अडीच हजार रुपयांची पैशाची पुंजी घेऊन फेरीवाले चोरटे फरार झाले. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या लुटीमुळे लोकल, एक्सप्रेसमधील फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा चर्चेला आला आहे. लोकल, मेल एक्सप्रेसमधील काही फेरीवाले हे चोरीचे प्रकार करतात, अशा प्रवाशांच्या तक्रारी आहेत. उपनगरीय महिला प्रवासी रेल्वे महासंघाच्या अध्यक्षा लता अरगडे यांनी लोकल, मेल, एक्सप्रेसमधील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी वेळोवेळी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# लाड दाम्पत्याकडून आरोग्य क्षेत्रात नागरिकांची सेवा





**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार प्रसाद लाड हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी नावारूपास आणलेल्या अंत्योदय प्रतिष्ठान आणि मी मुंबई अभियान अभिमान प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक सामाजिक हिताची कामे केली जातात, ज्याद्वारे मुंबईसह उपनगरांमध्ये आरोग्य विषयातदेखील महत्त्वाचे काम केले जात आहे. यामध्ये त्यांच्या धर्मपत्नी व मी मुंबई अभियान अभिमान प्रतिष्ठानच्या सचिव नीता लाड यांची त्यांना मोलाची साथ लाभत आहे.

महाराष्ट्राचे तत्कालीन विरोधी पक्षनेते व महाराष्ट्राचे सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सायन येथे छत्रपती शिवाजी महाराज डायलिसीस सेंटरचे लोकार्पण करण्यात आले होते. या डायलिसीस सेंटरच्या माध्यमातून मागील पाच महिन्यांच्या काळात अनेक गरजू रुग्णांना सेवा देण्याचे काम झाले आहे. या काळात जवळपास ३४२९ गरजू रुग्णांचे डायलिसीस करून देण्यात आले आहे तसेच प्रतिदिन ६८६ रुग्णांचे डायलिसीस करण्यात आले आहेत. सुरुवातीच्या काळात केवळ नाममात्र शुल्क आकारून हे डायलिसीस करण्यात आले, परंतु मी मुंबई अभियान अभिमान प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू असलेल्या या सेंटरमध्ये डायलिसीससाठी येणाऱ्या रुग्णांना या पुढील काळात मोफत सेवा देण्याचा निर्णय घेण्यात आला असून गरजू रुग्णांना या सेवेचा लाभ व्हावा हाच यामागील एकमेव उद्देश असल्याचे आमदार प्रसाद लाड यांनी स्पष्ट केले आहे.

या सर्व कामांकडे नीता लाड ह्या स्वतः लक्ष देत असतात. या ठिकाणी १० बेडचे डायलिसीस केंद्र कार्यरत असून ३० एप्रिल २०२२ रोजी तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या केंद्राचे लोकार्पण झाले. छत्रपती शिवाजी महाराज डायलिसिस केंद्र, संजय गांधी नगर, हायवे अपार्टमेंटसमोर, सायन-पनवेल हायवे, सायन येथे या केंद्राचे लोकार्पण झाले. दक्षिण मध्य मुंबईतील गरजू आणि सामान्य नागरिकांना या सुविधेचा लाभ होत आहे. अंत्योदयाच्या संकल्पनेला अधिक महत्त्व देत दक्षिण मध्य मुंबईतील धारावी, वडाळा, शाहूनगर, सायन कोळीवाडा, मानखुर्द, अण्णाभाऊ साठे नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, छत्रपती शिवाजी महाराज नगर, संगम नगर अशा एकूण १६ ठिकाणी यापूर्वीच चालता फिरता दवाखाना चल चिकित्सा केंद्र ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अधिकाधिक नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा याकरिता आमदार प्रसाद लाड यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

चालता फिरता दवाखाना अंतर्गत ६९० शिबिरांच्या माध्यमातून ४१०८८ गरजू रुग्णांना प्राथमिक सुविधा आणि तपासण्या पुरविण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये १७०९१ पुरुष आणि २३९९७ महिलांना या सुविधांचा लाभ झाला आहे. चालता फिरता दवाखाना चल चिकित्सा केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक शिबिराच्या माध्यमातून घरोघरी जाऊन नागरिकांचे आरोग्य निरोगी ठेवण्याचे काम केले जात आहे. येत्या काळात नवीन दोन रुग्णवाहिकांच्या माध्यमातून रुग्णसेवा करण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. आमदार प्रसाद लाड यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या व त्यांच्या धर्मपत्नी नीता लाड यांच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या या दोन्ही प्रकल्पांचा उद्देश हा गरजू नागरिकांची सेवा करणे व आरोग्याच्या दृष्टीने समाजात जागृती निर्माण करणे हाच आहे.

## दुखवटा

### बाबुशेठ मुल्ला



**खोपोली :** येथील नगर परिषदेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच झालेल्या निवडणुकीत नगराचे नगराध्यक्ष पदावर विराजमान झालेले बाबुशेठ मुल्ला यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांच्या निधनानंतर खोपोलीत सर्वपक्षीय शोकसभा घेण्यात आली. त्यावेळी त्यांना विविध पक्षीय नेते व सामाजिक संघटनांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच त्यांच्या जुन्या आठवणींना वक्त्यांनी उजाळाही दिला.

बाबुशेठ मुल्ला यांचे घर म्हणजे एक प्रकारे न्यायनिवाडा करण्याचे हक्काचे ठिकाण होते. अनेक वर्ष त्यांनी मुस्लिम समाजाचे अध्यक्षपद भूषविले. तर दसरा सण असो व इतर दिवाळी सण असो हिंदू बांधव देवळातून आल्यानंतर पहिले बाबुशेठ मुला यांना शुभेच्छा देत. ही परंपरा अनेक वर्ष सुरू राहिली.


या शोकसभेत त्यांचे स्मारक व्हावे असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तर माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांनी नगरपरिषदेने त्यांचे स्मारक उभारले नाही तर आपण स्वत: आपल्या जागेत त्यांचे स्मारक उभारू असे शोकसभेत सांगितले. शोकसभेला सर्वपक्षीय नेते उपस्थित होते.

# पनवेलमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ

## बंबावीपाडा येथे महिला बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात बांधकाम व्यावसायिक आणि रियल इस्टेटचा व्यवसाय करणाऱ्या एका महिला व्यावसायिकावर गोळीबार केल्याची घटना मंगळवारी रात्री बंबावीपाडा येथे घडली आहे. या घटनेत महिलेच्या पायाला गोळी लागली असून गोळीबार केल्यानंतर अज्ञात व्यक्ती पळून गेला. ही घटना समजतात पनवेल शहर पोलिसांचे पथकाने घटनास्थळी पोहचून घटनेची माहिती घेतली.



पनवेल परिसरात बांधकाम व्यावसायिक आणि रियल इस्टेटचा व्यवसाय करणाऱ्या सौ. सुप्रिया गणेश पाटील (वय ३०, रा. कोप्रोली, उरण) ह्या त्यांचा मावस भाऊ सर्वेश म्हात्रे सोबत त्यांच्या मित्राची निळी मारुती सुझुकी बलेनो कार (एमएच ४६ बीके ०६९८) ने पनवेल उरण जुन्या मार्गाने जात असताना बंबावीपाडा येथे एका अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून त्याचेकडील कोणत्यातरी अग्नीशस्त्राने सुप्रिया यांच्यावर गोळीबार करून पळुन गेला आहे.

यामध्ये सुप्रिया यांच्या डावे पायाचे गुडघ्याखाली गोळी लागून जखमी झाल्याने त्यांना तत्काळ अपोलो रुग्णालय येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. ही घटना समजतात पनवेल शहर पोलिसांचे पथकाने घटनास्थळी पोहचून त्यांनी घटनेची माहिती घेतली.

गोळीबार व्यावसायीक वादातून झाली असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तवला जात आहे. दरम्यान, नुकतेच नेरूळ येथे बांधकाम व्यावसायिक सावजी पटेल यांच्यावर सुद्धा गोळीबार झाल्याची घटना घडली होती. एकाच महिन्यात दुसऱ्यांदा एका बांधकाम व्यावसायिकांवर गोळीबाराची घटना घडल्याने बांधकाम व्यावसायिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

## शिवकर येथे तरुणाची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील शिवकर येथे एका अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाने एका अल्पवयीन तरुणाची कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना घडली आहे.

विनय विनोद पाटील असे या अल्पवयीन तरुणाचे नाव असून त्याची मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाने कुऱ्हाडीच्या सहाय्याने हत्या केल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक घटनास्थळी रवाना झाले होते. हत्या कोणी व कोणत्या उद्देशाने केली असावी याचा शोध घेण्याचे आवाहन पनवेल शहर पोलिसांसमोर आहे.

# खासदार गिरीश बापट यांना पनवेलमध्ये श्रद्धांजली



(छाया: योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पुण्याचे खासदार गिरीश बापट यांचे बुधवारी (दि. २९) वयाच्या ७२व्या वर्षी निधन झाले आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे गेल्या दीड वर्षांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांना पनवेल येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात मवीर सावरकर गौरव यात्राफ बद्दल आयोजित करण्यात आलेली पत्रकार परिषदेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली.

या वेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, भाजप जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी बापट यांना श्रद्धांजली वाहिली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अर्णव चिंचकरचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



(छाया : अक्षय शार्दूल)

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलचा अर्णव पद्माकर चिंचकर याची ऑल इंडिया सैनिक स्कूलसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल त्याचे रयतचे मॉनेजिंग कौंन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्समध्ये भावी अधिकारी होऊ इच्छिणाऱ्या मुला-मुलींसाठी दर वर्षी ऑल इंडिया स्कूलच्या माध्यमातून परीक्षा घेतली जाते. अत्यंत कठीण आणि अवघड समजली जाणाऱ्या परीक्षेचा निकाल नुकताच लागला आहे. या निकलात रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पाचवीत शिकाणारा अर्णव पद्माकर चिंचकर याची निवड झाली आहे. अर्णव चिंचकर याने ३०० पैकी २५८ गुण मिळवून पंजाब प्रांतातील कपूरथला सैनिक स्कूलमध्ये निवड झाली आहे. त्याच्या या स्कूलसह काळंबोली येथील आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचा मोलाचा वाटा आहे.

अर्णवला मिळालेल्या या यशा बद्दल त्याचे रयतचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे.

या वेळी भाजपच्या भटके विमुक्त आघाडीच्या उत्तर रायगड महिला अध्यक्षा विद्या तामखेडे, पद्माकर चिंचकर आदी उपस्थित होते.

# जावळे येथे मामाचा अल्पवयीन भाचीवर अत्याचार; आरोपी अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

आपल्याच मावसबहिणीच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरीने शारिरिक संबंध प्रस्थापित करून तिला गरोदर केल्याचा संतापजनक प्रकार पनवेल तालुक्यातील जावळे गावात घडला आहे. पीडित मुलीच्या आईने तिला उपचाराकरीता हॉस्पिटल येथे नेल्यावर पिडीत मुलगी ही गरोदर असल्याचे समजले. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने तत्काळ पनवेल शहर पोलीस ठाणे गाठत आपल्या मावसभावा विरोधात तक्रार दाखल केली आहे.



आरोपी बिरेंद्र लखन गंझू (वय २७, रा. झारखंड) याने पीडित मुलीबरोबर ती अल्पवयीन असल्याचे माहिती असूनसुद्धा तिच्यासोबत बळजबरीने शारिरिक संबंध प्रस्थापित केले. यामुळे पीडित मुलगी ही गरोदर राहिली. दरम्यान, पीडित मुलीची तब्येत खराब झाल्याने तिच्या आईने तिला उपचाराकरीता हॉस्पिटल येथे नेल्यावर पिडीत मुलगी ही गरोदर असल्याचे समजले. त्यांनतर पीडितेच्या आईने तत्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्यात आरोपी बिरेंद्र लखन गंझू विरोधात तक्रार दाखल केली.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांनी घटनेचे गंभीर ओळखून तत्काळ गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पोलीस हवालदार परेश म्हात्रे व पोलीस शिपाई प्रसाद घरत यांना गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासद्वारे आरोपी हा मुंबई येथील गोरेगाव या ठिकाणी नोकरीवर असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या जागेचा शोध पोलिसांनी त्याला नोकरीच्या ठिकाणावरून अटक केली आहे व त्याच्याविरोधात पॉस्को अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

# बालवाडीतील मुलांना चटईचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील पंचशील नगर येथील बुध्द विहारात कार्यरत असलेल्या बालवाडीत माजी नगरसेवक व भाजप प्रवक्ते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी स्वखर्चाने बालवाडीत शिकत असलेल्या मुलांना बसण्यासाठी चटई दिल्या.

या चटईंचे वाटप ॲड. प्रकाश बिनेदार यांचे स्वीय सचिव व भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, पनवेल शहर मंडलचे अध्यक्ष श्याम साळवी यांच्या हस्ते रविवारी (दि. २६) करण्यात आले. या वेळी बुथ अध्यक्ष पप्पु साळवे, मुख्य शिक्षक रमेश अय्यर, शोभा मिठबावकर, चित्रा भंडारी, वंदना चंदनशिवे, वैशाली चंदनशिवे, नैना पासवान, लता सुर्वे, पुनम काकडे, कल्पना देवडे, सुनिता तायडे, रेहाना शफी, शांताबाई प्रधान, जयश्री देवडे, मंदा दास आदी उपस्थित होते.

दरम्यान, भाजप नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यामार्फत नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात.

# पनवेलमध्ये सत्यम टेक्सटाईल मार्केट होसलेस साडी डेपो

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील कापड बाजारात नव्याने सत्यम टेक्सटाईल मार्केट होसलेस साडी डेपो सुरू झाले आहे. या साडीडेपोमध्ये ब्रँन्डेड साड्या, डिजायनर घागरा, पैठणी, नऊवारी, सुटींग शर्टींग, ड्रेस मटेरीयलसह असंख्य व्हरायटी होसलेस भावामध्ये उपलब्ध आहेत. सत्यम टेक्सटाईल मार्केटचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २९) झाले.

या डेपोच्या भव्य शुभारंभावेळी ५००० रुपयांच्या पुढील खरेदीवर आकर्षक भेटवस्तू देण्याची खास ऑफर देण्यात आली होती. तसेच सर्व खरेदीवर १० टक्के डिस्काउंटही ग्राहकांना देण्यात आले होते. या वेळी पनवेल महापाकिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, रूचिता लोंढे, भाजपचे पनवेल शहर खजिनदार संजय जैन, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, कपिल शेळके, संतोष कोकाटे, अविनाश पाटील, आकाश पाटील, सचीन पाटील, गजानन साखरे, हनुमंत जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलच्या जुना ठाणा नाका रोडला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या जुन्या मुख्यालयापासून ते नवीन मुख्यालयाला जोडणाऱ्या जुना ठाणा नाका रस्त्याचे नाव बदलून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मार्ग नामकरण करा, अशी मागणी शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात प्रथमेश सोमण यांनी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनाही याबाबतचा पाठपुरावा करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

सोमण यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेलमध्ये सध्याचे असलेले पालिका मुख्यालय (जुनी नगर परिषद बिल्डिंग) ही रस्त्याच्या ज्या टोकापासून सुरू होते तो रस्ता पुढे ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहावरून प्रांत कार्यालयावरून सरळ पुढे मुंबई पुणे हायवे लगत असलेल्या आपल्या नवीन प्रस्तावित महापालिकेच्या कार्यालयापर्यंत जाऊन पोहचतो. हा रस्ता पहिल्यापासूनच जुना ठाणा नाका रोड या नावाने ओळखला जातो. या रस्त्याला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मार्ग असे नाव देऊन नामकरण करण्यात यावे. विनायक दामोदर सावरकर यांचे नाव या रस्त्याला मिळाल्यास त्या रस्त्याचे महत्त्व आणखी वाढणार आहे.

यामागणी संदर्भात शिवसेनेचे शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, विभाग प्रमुख आशिष पनवेलकर हे सुद्धा पाठपुरावा करणार असल्याची माहिती प्रथमेश सोमण यांनी दिली.

# अष्टमीनिमित्त दुर्गा माता मंदिरात धार्मिक कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील दुर्गा माता मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही चैत्र महिन्यातील अष्टमीनिमित्त बुधवारी (दि. २९) होम हवनासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भक्तगणांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

यानिमित्ताने बुधवारी सकाळपासूनच मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे अष्टमी महा-हवन भक्तगणांच्या साथीने झाला. तसेच या वेळी पूजा, कीर्तन, भजन आदी धार्मिक कार्यक्रम झाले. त्याचप्रमाणे उपस्थित भक्तांसाठी आयोजित महाप्रसादाचे लाभ भक्तगणांनी घेतला.

# विकासाकडे झेपावणारं पनवेल अन् आमचाही सहभाग



**-अशोक गायकवाड**
**अध्यक्ष, लोकपरिषद सामाजिक संस्था**

मी मुळचा लातूर जिल्ह्यातील उदगीरचा नोकरीनिमित्त १९९४ मध्ये पनवेलला आलो. नवीन पनवेलमध्ये सिडकोकडून नवीन शहर वसवले जात होते. त्यावेळी तेथे मोठ्या इमारती नव्हत्या. त्यामुळे मोकळा परिसर नुकतेच सिडकोचे रस्त्यांचे काम सुरू होते. त्यामुळे रस्त्यावर लाईट ही नव्हते. संध्याकाळ झाली की सगळीकडे अंधार व्हायचा, पण तेथील निसर्ग रामया वातावरण पाहून नवीन पनवेल मध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. आज तो योग्यच होता असावे म्हणायला हवे.

नवीन पनवेलमध्ये त्यावेळी मोठी दुकाने नव्हती थोडी फार ए टाईपमध्ये होती. त्यामुळे आम्हाला खरेदीसाठी पनवेलला जायला लागायचे. त्यासाठी शेअर रिक्षा असायाच्या त्यांचे भाडे त्यावेळी तीन रुपये होते. गावाला फोन करायचा तर ए टाईप मध्ये असलेल्या एसटीडी बूथ मध्ये यावे लागायचे. पनवेलला रेल्वे लाईन ओलांडून चालत ही जाता येत असे. अनेक जण रेल्वे लाईन ओलांडूनच जात असत कारण त्यावेळी रेल्वेच्या मोजक्याच गाड्या असायच्या. नवीन पनवेलला जोडणारा पूल ही झालेला नव्हता. त्यावेळी पनवेल वेगवेगळ्या आळया आणि त्यामध्ये जुने वाडे होते. त्यांच्या नावावरून त्या परिसराची ओळख होती. पत्ता विचारला की पनवेलकर अमुक वाड्या जवळ किवा आळीमध्ये असेच सांगायचे. ते सांगताना त्यांना अभिमान वाटायचा.

पनवेलमध्ये लोकल सुरू झाली आणी पनवेलचा झपाट्याने विस्तार होऊ लागला. रोजगाराच्या शोधत मुंबई सारख्या माया नगरीत आलेले अनेक जण राहण्यासाठी पनवेलला पसंती देऊ लागले. शासनानेही सिडकोची स्थापना करताना येथे शहरे वसवण्याचा निर्णय घेतलाच होता. त्यामुळे आजूबाजूच्या गावांचा त्यामध्ये समावेश झाल्याने त्या गावांत मूलभूत सुविधा सिडकोने दिल्याने तेथे उंच इमारती झाल्या. मग त्यामध्ये पनवेल जसे मागे राहणार. वाड्यांचे शहर म्हणून ओळख असलेल्या पनवेलमधील वाडे होते. विकासाच्या लाटेत जमीनदोस्त झाले. भौगोलिक विस्तारासाठी जमीन अपुरी पडू लागल्यानंतर वाड्यांची जागा उंच इमारतींनी घेतली.

पनवेल नगरपालिकेची २०१६ मध्ये महापालिका झाली. एक पदरी रस्त्याची जागा आता चार पदरी सिमेंटच्या रस्त्यांनी घेतली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्या भोवती जाळीचे कंपाऊंड आणि एक छोटेसे गेट होते. आज त्या ठिकाणी छान सजावट केली आहे. छत्रपती शिवाजी चौकात उभारलेली शिल्प व तेथील आकर्षक विद्युत रोषणाई पहाण्यासाठी संध्याकाळी लहान मुले आपल्या पालकांना घेऊन येतात. वडाळे तलावाबद्दल तर बोलायलाच नको. सकाळी मॉर्निंग वॉकला गर्दी असते तशीच संध्याकाळी फिरायला येणारांची गर्दी असते. तेथे असलेले भेळवाले आईसक्रीमवाले आणि त्यांच्या भोवती असणारी गर्दी पाहून मुंबईच्या चौपाटीवर आल्या सारखेच वाटते.

महापालिका झाल्यापासून नवीन पनवेलमध्ये कचरा रोज उचलला जात असल्याने परिसरात स्वच्छता असते. उद्याने ही आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना सायंकाळी तेथे जाता येते. त्यांच्यासाठी विरंगुळा केंद्र, वाचनालयाच्या सुविधा आहेत, पण मुलांना खेळायला मैदानाची आवश्यकता आहे. कारण येथील मैदाने शाळांच्या ताब्यात असल्याने त्या शाळा त्यांना कुलूप लावतात. त्यामुळे मुलांना सुटीच्या दिवशी खेळायला जागाच नसल्याने मुले सोसायटीत खेळतात. त्यावेळी चेंडू लागून कोणाच्या काचा फुटतात त्यातून भांडणे होतात. त्यामुळे आज मैदानांची गरज आहे. पनवेलमध्ये रिक्षावाल्यांना शिस्त नाही. त्यांना शिस्त लावण्यासाठी कोणी तरी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**(शब्दांकन : नितिन देशमुख)**

## संपादकीय

# दिलदार, सर्वसमावेशक गिरीशभाऊ

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पुण्याचे विद्यमान खासदार गिरीश बापट यांचे बुधवारी निधन झाले. सुसंस्कृत आणि सर्वसमावेशक नेतृत्व असलेल्या गिरीशभाऊंच्या जाण्याचे पुणे पोरके झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचा जनसंपर्क दांडगा आणि सर्वपक्षीयांशी सलोख्याचे संबंध होते. त्यांच्या निधनांनंतर सर्व स्तरांमधून हळहळ व्यक्त होत आहे.

**एका कंपनीतील कर्मचारी ते खासदार असा गिरीश बापट यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. त्यांचा जन्म ३ सप्टेंबर १९५० रोजी झाला. तळेगाव दाभाडेमधून प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांचे माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेत झाले. बीएमसीसीत वाणिज्य शाखेची पदवी घेतल्यावर बापट १९७३मध्ये टेल्को कंपनीत कामगार म्हणून रूजू झाले. तेथे काम करीत असताना कामगार संघटनेच्या माध्यमातून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. कामगारांच्या मागण्यांसाठी त्यांनी अनेकदा लढा दिला. त्या वेळी दोन वर्षांच्या काळात आणीबाणीमध्ये ते १९ महिन्यांसाठी नाशिक जेलमध्ये होते. राजकीय जीवनात सर्वप्रथम १९८३मध्ये ते पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. सलग तीन टर्म ते नगरसेवक होते. विशेष म्हणजे महापालिकेत पक्षाची सत्ता नसतानाही त्यांनी स्थायी समितीचे अध्यक्षपद मिळवले. पुढे १९९३मध्ये झालेल्या कसबा पेठ विधानसभेच्या पोटनिवडणुकीत गिरीश बापट यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर त्यांनी राजकारणात मागे वळून पाहिले नाही. कसबा पेठ मतदारसंघात १९९५पासून सलग पाच वेळा ते आमदार म्हणून विजयी झाले. राज्याच्या मंत्रिमंडळात अनेक खात्यांचे मंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यानंतर २०१९मध्ये पुण्याचे खासदार म्हणून विक्रमी मताधिक्याने ते निवडून आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत घडलेल्या गिरीशभाऊंनी जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा आणि पक्षभेदांच्या भिंती ओलांडून समाजकार्य तसेच विकासाचे राजकारण केले. त्यामुळेच चार दशकांच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत त्यांना पुणेकरांचे अलोट प्रेम मिळाले. नुकत्याच झालेल्या कसबा पेठ विधानसभेच्या पोटनिवडणुकीत बापट यांनी व्हीलचेअर बसून आणि कृत्रिम श्वासोच्छवास घ्यावा लागत असतानादेखील पक्षासाठी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता. पक्षनिष्ठा कशी असावी याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी या निमित्ताने घालून दिला. एवढेच नव्हे तर गुढीपाडव्यानिमित्त कसबा गणपतीसमोर त्यांच्या खासदार निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांच्या उद्घाटनाला काँग्रेसचे विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर आणि भाजप नेते हेमंत रासने यांना आमंत्रित करण्यात आले होते. हाच सर्वसमावेशकपणा बापट यांच्या यशस्वी राजकीय कारकिर्दीचे वैशिष्ट्य होते. विरोधी पक्षाची सत्ता असली तरी जनतेची कामे करून घेण्याचे कसब त्यांना अवगत होते. दांडगा लोकसंपर्क ही बापट यांची जमेची बाजू मानली जायची. त्यामुळे त्यांचा राजकीय प्रवास नेहमीच सुकर झाला. असा हा सुसंस्कृत, दिलदार नेता आपल्यातून निघून गेला आहे. पुण्यासह भाजपने अलीकडच्या काळात तीन मोठे नेते गमावले. पहिल्यांदा कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक, पिंपरी चिंचवडमधील आमदार लक्ष्मण जगताप आणि आता पुण्याचे खासदार गिरीश बापट यांचे असाध्य आजाराने निधन झाले. त्यांना सर्वपक्षीयांनी श्रद्धांजली वाहिली आणि त्यांचे मोठेपण अधोरेखित केले. ईश्वर बापट यांच्या आत्म्यास चिरशांती आणि हे दुःख पचविण्याची ताकद त्यांच्या कुटुंबीयांना देवो ही प्रार्थना! गिरीशभाऊ आता आपल्यात शरीररूपी नसले तरी स्मृती रूपाने सदैव असतील एवढे नक्की!**

# विहिरींमध्ये जलपुनर्भरण करण्याची गरज





**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात बोअरवेलचे प्रमाण गेल्या चार वर्षांमध्ये सातत्याने वाढत असताना जिल्ह्यातील सर्वाधिक भुजलाचे दूषित नमुनेही आढळून आले आहेत. सहा वर्षांपूर्वी पुण्यातील रासायनिक पृथ:करण प्रयोगशाळेने ग्रामीण रुग्णालयाबाहेर केलेल्या उत्खननादरम्यान तालुक्यातील भुजलाचा गोपनीय अहवाल सादर केला होता. त्याकडे दुर्लक्ष करून पाणीटंचाई निवारणाच्या राजकीय प्रतिष्ठेपोटी बोअरवेलची संख्या वाढत गेली असल्याने ही दूषित पाणी नमून्यांची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे मत आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यामध्ये विविध जलसंधारणाची कामे लोकसहभागातून केली जात असल्याने टंचाई आराखड्यातून टंचाईग्रस्त गावांची संख्या कमी झाल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्याच्या पाणीटंचाई उपाययोजना कृती आराखड्यामध्ये पंचायत समितीमार्फत २०१०-११मध्ये तीन वेळा बोअरवेल आराखडा प्रस्तावित करण्यात आला. पहिल्या आराखड्यात १ जानेवारी ते ३१ मार्च २०१०दरम्यान १५ गावे आणि ६१ वाड्यांचा समावेश या बोअरवेल प्रोग्राममध्ये करण्यात आला. १ एप्रिल ते ३० जून २०१०च्या बोअरवेल प्रोग्राममध्ये आठ गावे १३ वाड्यांचा समावेश करण्यात आला. १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०११ या कालावधीतील पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यात ४२ गावे आणि १७२ वाड्यांमध्ये अशा एकूण २१४ ठिकाणी बोअरवेलची उपाययोजना करण्यासाठी प्रस्ताव करण्यात आला. याच पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यात १ जानेवारी ते ३१ मार्च २०१२मध्ये चार गावे आणि २२ वाड्या अशा एकूण २६ ठिकाणी बोअरवेल खणण्याचा प्रस्ताव करण्यात आला. या पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यात ३१ डिसेंबरपर्यंतची बोअरवेलची प्रस्तावित मागणी आणि ३१ मार्च २०१२पर्यंत बोअरवेलची प्रस्तावित मागणी पाहता आता प्रत्यक्ष आराखड्यात तातडीने मंजुरी होऊ शकेल, अशी संख्या केवळ २६ बोअरवेलची असल्याने यामध्ये ४० बोअरवेलची विशेष अत्यावश्यक बाब म्हणून मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी आणि जिल्हा पाणीटंचाई निवारण कृती समितीकडे सादर करण्यात आला. यामुळे तालुक्यात प्रचंड प्रमाणात भूजल उपशासाठी बोअरवेल करण्यात आल्याचे निष्पन्न होत असून पुणे येथील रासायनिक पृथ:करण प्रयोगशाळेच्या गोपनीय अहवालाकडे यामुळे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याखेरिज नळपाणीपुरवठा योजनांच्या साठवण टाक्यांना झाकणे बसविली नसणे, पाणीपुरवठ्याचे स्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न नसणे, नळ योजनेच्या पाईपलाईनची गटार व अन्य भागातून जोडणी, गंजलेले पाईप अशा अनेक बाबी पेयजलाचे नमुने दूषित असण्यास कारणीभूत ठरले आहेत.

रायगड जिल्ह्यातील जिल्हा प्रयोगशाळा अलिबागकडून पोलादपूर तालुक्यातील ऑक्टोबर २०१२मध्ये पाठविण्यात आलेले ३७ दूषित पाण्यांचे नमुने तपासून आले असता त्यापैकी १३ पाणी नमुन्यांचा अहवाल पिण्यास योग्य असा प्राप्त झाल्याने नोव्हेंबर २०१२मध्ये पुन्हा त्याच ठिकाणी दूषित पाण्याचे नमुने घेऊन जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे, मात्र तालुक्यातील लोकवस्तीला पेयजलासाठी उपलब्ध सर्व स्रोतांचे नमूने एकाचवेळी संकलित करून पाठविले गेले असता या पाण्याचा अहवाल पाहता कोणताही प्रदुषणकारी कारखाना नसूनही हे पाणी नैसर्गिकरित्या पिण्यास अयोग्य असल्याचा अभिप्राय आश्चर्यकारक असल्याचे दिसून येते. ऑक्टोबर २०१२मध्ये आडावळे बुद्रकु बौद्धवाडी हातपंप, कापडे बुद्रुक भराववाडी हातपंप व भवानवाडी हातपंप, देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत हळदुळे येथील बोअरवेल, देवळे येथील नळपाणी योजना, देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत दाभिळ येथील नळयोजना, बोरावळे येथील गुडेकरकोंड येथील झऱ्याच्या पाण्याचा स्रोत, भोगाव खुर्द येलंगेवाडीतील साठवण तलाव, कोतवाल खुर्द येथील सार्वजनिक नळ, देवपूर ग्रामपंचायत हद्दीतील गांजवणे येथील सार्वजनिक नळ, वझरवाडी येथील सुरबाचीवाडी साठवण टाकी, सडवली ग्रामपंचायत हद्दीतील चोळई नळ पाणीपुरवठा योजना आणि चोळई येथीलच दुसरी नळ पाणीपुरवठा योजनांचे पाणी दूषित असल्याचा अहवाल जिल्हा प्रयोगशाळेकडून प्राप्त झाला असून दूषित पाण्याच्या नमुन्यांचे प्रमाण ३५ टक्के असल्याचे दिसून आले आहे.

जिल्हा आरोग्य यंत्रणेने केवळ दूषित पाण्यामुळे पसरणारे साथीचे आजार पोलादपूर तालुक्यात दिसून येत नसल्याचे समाधान न मानता फ्लोराईडस् व अन्य घातक क्षारयुक्त पाणी पिण्याने तालुक्यातील जनजीवनावर होणारे दूरगामी घातक दुष्परिणाम लक्षात घेण्याची गरज निर्माण झाली असून पहिले दूषित पाणी नमुन्याचे प्रमाण कमी करण्यासाठी दुसऱ्यांदा पुन्हा नव्याने तेथील पाण्याचे नमुने पाठविण्याचा प्रकार ही वेगळीच अजब उपाययोजना असल्याचे आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

पोलादपूर तालुक्याच्या २०२२ या गेल्या वर्षीच्या पाणीटंचाई निवारण आराखड्यामध्ये भूजल उपसा करण्याकामी १३ गावे आणि ५५ वाड्यांमध्ये अशा ६८ ठिकाणी सुमारे ४० लाख ८० हजार रुपयांची विंधन विहिरी घेण्याची मागणी समाविष्ट करण्यात आली आहे. आतापर्यंत विंधन विहिरी दुरूस्ती आणि विंधन विहिरी घेण्याच्या उपाययोजनांमुळे पोलादपूर तालुक्यात भुमातेला हजारो छिद्र पाडून दररोज लाखो लिटर्स पाण्याचा उपसा केला जात असून भुजलाचा पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात घटत आहे. एकीकडे जमिनीवरील पाण्याचा साठा संपुष्टात येत असताना भुजलाच्या पाण्याचे प्रदूषण व मोठ्या प्रमाणात उपसा या बाबींकडे आता फार काळ दुर्लक्ष करून चालणार नाही. भूगर्भातील पाणी उपसून झाल्यानंतर पुन्हा धरणी मातेचे पाण्याचे ऋण फेडण्यासाठी जलपुनर्भरण करण्याची निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची संकल्पना ग्रामीण भागातही युद्धपातळीवर राबवली असून दरवर्षी पावसाळ्यात विंधन विहिरींमध्ये छपरावरून वाहून जाणारे पाणी पुन्हा भरल्यास बारमाही जलस्रोत खुला राहू शकतो. प्रत्येक पंचायत समितीने वनराई बंधाऱ्यांचे उद्दिष्ट ओलांडून मोठया प्रमाणात जलसाठा उपलब्ध झाल्याने २०१४-२२दरम्यान टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी तीन आठवडे उशिरा मागणी झाली हे बंधाऱ्यांचे यश आहे. विहिरींच्या जलपुनर्भरणासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची जबाबदारीही लोकसहभागातून घेतल्यास अधिकाधिक बोअरवेलमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग तंत्रज्ञानाने जलपुनर्भरण करून भुजलाची पातळीही वाढविणे शक्य होणार आहे.

ज्येष्ठ निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता कार्यक्रमामध्ये पोलादपूरचे गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांनी पोलादपूर तालुक्यातील श्रीसदस्यांच्या जलसंधारणाच्या कामांमुळे तालुक्यातील पाणीटंचाईचा कालावधी कमी झाला असून अनेक गावे टंचाई निवारण आराखड्यातून वगळण्यात आली असल्याची माहिती दिली.

## बदलते तंत्रज्ञान

# 'यूपीआय' पेमेंट एप्रिलपासून महागणार




सध्या डिजिटल पेमेंट करण्याचे प्रमाण देशभरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढले आहे. प्रत्येक ठिकाणी ऑनलाईन स्वरूपात पेमेंट करता येत असल्यामुळे कॅश जवळ बाळगण्याचे प्रमाणदेखील कमी झाले आहे. आपण ऑनलाईन व्यवहारांसाठी युपीआय वापरत असाल तर ही तुमच्यासाठी खूप महत्त्वाची बातमी समोर आली आहे. १ एप्रिलपासून युपीआय व्यवहार महाग होणार आहेत. तुम्ही दोन हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे भरल्यास तुम्हाला अतिरिक्त शुल्क द्यावे लागणार आहे. याबाबत नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (युपीसीआय) ने एक परिपत्रक जारी केले आहे.

युपीसीआयने अलीकडेच एक परिपत्रक जारी केले आहे ज्यात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (युपीआय)ला व्यापारी व्यवहारांवर प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स (पीपीआय) शुल्क लागू करण्यास सांगितले आहे. परिपत्रकानुसार दोन हजार रुपयांपेक्षा जास्त पीपीआय व्यवहारांवर १.१ टक्के शुल्क भरावे लागेल. हे शुल्क वापरकर्त्याला व्यापारी व्यवहारांसाठी भरावे लागणार आहे.

बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार पीपीआयच्या युपीआय पेमेंटवर १.१ शुल्क आकारले जाणार आहे. पीपीआयमध्ये वॉलेट किंवा कार्डद्वारे व्यवहार केला जातो हे आपल्याल माहितीच आहे. इंटरचेंज शुल्क सामान्यत: कार्ड पेमेंटशी संबंधित असतात आणि व्यवहार स्वीकारण्यासाठी आणि खर्च कव्हर करण्यासाठी आकारले जातात.

युपीआय पेमेंट सिस्टीम सध्या शून्य व्यापारी सवलत म्हणजेच (एमडीआर) मॉडेलवर चालते, मात्र युपीआयसाठी नवीन नियम आल्यामुळे यामध्ये अधिक चार्ज लावला जाऊ शकतो. अशा परिस्थितीमध्ये चार्जेस संबंधित नवीन मॉडेलचे ३० एप्रिलपर्यंत किंवा त्याआधीच त्याचे पुनरावलोकन केले जाऊ शकते.

# प्रभू रामचंद्रांचा जन्म अर्थात राम नवमी



**निमित्त**

चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले श्री राम यांचा जन्म झाला अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात. या दिवशी दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर (दुपारी १२ वाजता) रामजन्माचा सोहळा होतो.

श्रीराम नवमीच्या दिवशी मठ-मंदिरात भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. काही ठिकाणी तर गुढीपाडवा ते रामनवमी या काळात रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन वगैरे कार्यक्रमही केले जातात. श्री राम हे सर्व आबालवृद्धांची लाडके दैवत असल्यामुळे सर्व लहान थोर मंडळी या उत्सवात भाग घेतात.

हिंदू धर्मग्रंथानुसार त्रेतायुगातील रावणाचे अत्याचार संपवण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान विष्णूने मृत्यूच्या जगात श्री राम म्हणून अवतार घेतला. त्यांचा जन्म चैत्र शुक्ल नवमीला राणी कौशल्याच्या पोटी पुनर्वसु नक्षत्रात आणि कर्क राशीत राजा दशरथाच्या घरी झाला.

रामनवमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते. तेलंगणातील भद्राचलम मंदिर हे अशा ठिकाणांपैकी एक आहे जिथे रामनवमी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. रामनवमी हा सण गेल्या अनेक वर्षांपासून साजरा केला जातो.

रामायणानुसार अयोध्येचा राजा दशरथ याला तीन बायका होत्या, परंतु फार काळ राजा दशरथला संततीचे सुख कोणीही देऊ शकले नाही. त्यामुळे राजा दशरथ खूप अस्वस्थ असायचे. पुत्रप्राप्तीसाठी राजा दशरथ यांना वशिष्ठ ऋषींनी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याची कल्पना दिली होती. यानंतर राजा दशरथाने आपल्या जमाई महर्षी ऋषिश्रृंगासोबत यज्ञ केला. त्यानंतर यज्ञकुंडातून एक दैवी पुरुष हातात खिरीची वाटी घेऊन बाहेर आला.

यज्ञ संपल्यानंतर महर्षी ऋषीशृंगाने दशरथाच्या तीन पत्नींना खीर खायला दिली. खीर खाल्ल्यानंतर काही महिन्यांनी तिन्ही राण्या गरोदर राहिल्या. बरोबर नऊ महिन्यांनंतर राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौशल्याने राम हा भगवान विष्णूचा सातवा अवतार, कैकेयीने भरत आणि सुमित्राने लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना जन्म दिला. भगवान रामाचा जन्म दुष्टांचा नाश करण्यासाठी पृथ्वीवर झाला होता.

कबीरजी आदिरामाची व्याख्या स्पष्ट करतात की आदिराम हा अविनाशी देव आहे जो सर्वांचा निर्माता आणि पालनकर्ता आहे. ज्याच्या एका इशाऱ्यावर पृथ्वी आणि आकाश कार्य करतात, ज्याच्या स्तुतीमध्ये तेहतीस श्रेणी देवी-देवता नतमस्तक होतात. जो पूर्णपणे मोक्ष आणि आत्मस्वरूप आहे.

भारतभर रामजन्म हा चैत्र शुक्ल नवमीला झाला असे समजले जात असले तरी ज्या अयोध्येत रामाचा जन्म झाला, त्या अयोध्येतील वैश्य समाज रामाचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पंचमीला झाला असे मानतात. त्या पंचमीला अगहन पंचमी म्हणतात. (मार्गशीर्षाला हिंदीत अगहन म्हणतात!)

हा सण भारतात श्रद्धेने आणि श्रद्धेने साजरा केला जातो. चैत्र नवरात्रीचीही समाप्ती रामनवमीच्या दिवशी होते. हिंदू धर्मग्रंथानुसार भगवान श्री रामजींचा जन्म या दिवशी झाला होता. म्हणून भक्त ही शुभ तिथी राम नवमी म्हणून साजरी करतात आणि पवित्र नद्यांमध्ये पवित्र स्नान करतात.

**(साभार विकिपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**रेडी (सिंधुदुर्ग) : गणेश मंदिराजवळील विलोभनीय दृश्य टिपले आहे दिलीप रेडकर यांनी.**

## आरोग्य प्रहर

# तेलकट केसांवर करा 'हे' उपाय ...!



ज्या दिवशी तुम्ही केस धुता त्याच दिवशी तुमचे केस तेलकट होतात का? तुमचे उत्तर कदाचित हो असेल, पण याचा अर्थ असा नाही की ते वांरवार धूत राहावे. त्यापेक्षा त्यावर चांगला पर्याय शोधा आणि तुमच्या तेलकट केसांपासून सुटका मिळवा.

तुमच्या तेलकट केसांच्या समस्यांवरील उपाय सांगण्यासाठी डर्मटॉलॉजिस्ट डॉ. जया भाटिया यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यामध्ये त्या सांगतात की, तुमच्या केसांसाठी वापरणाऱ्या उत्पादनांमध्ये काही बदल केल्याने तुम्हाला तेलकट टाळूपासून मुक्ती मिळण्यास मदत होईल. तुमचा शॅम्पूमध्ये सेलेनियम सल्फाइड आणि झिंकसारख्या घटक आहेत का हे तपासा. हे टाळूवरील तेलाचे उत्पादन कमी करण्यासाठी उत्तम आहेत. सॅलिसिलिक ॲसिडदेखील एकंदर ऑइल बिल्ड अप काढून टाकण्यात आश्चर्यकारक काम करते. स्निग्धता दूर ठेवण्यासाठी या घटकांनी पॅक केलेला शॅम्पू वापरा, तिने लिहिले.

तेलकट केस हे मुळात टाळूवर वाढलेल्या तेल उत्पादनाचा परिणाम आहे. याबाबत बोलताना स्पर्श हॉस्पिटलमधील त्वचाशास्त्रज्ञ आणि त्वचा शल्यचिकित्सक, सल्लागार डॉ. अनघा समर्थ, यांनी सांगितले की, केस तेलकट होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यापैकी काही खाली समाविष्ट आहेत.

मोठ्या सेबेशियस ग्रंथी असणाऱ्यांमध्ये एक उपजत क्षमता असते, ज्यामुळे त्यांच्या केसांचा तेलकटपणा वाढतो. जास्त व्यायामामुळेही तेलाचे उत्पादन वाढू शकते. काहीवेळा, तणावामुळे तेलाचे उत्पादन वाढू शकते कारण ते कॉर्टिसॉल सारख्या काही संप्रेरकांवर परिणाम करते.

जर तुमची टाळू तेलकट आणि खवलेयुक्त असेल, तर तुमचे केस जास्त वेळा खाजवू नका आणि सॅलिसिलिक ॲसिडसारखे घटक वापरणे चांगले. जर तुम्ही तुमचे केस खूप वेळा धुत असाल, विशेषत: महिलांसाठी, तर ते टाळूच्या संरक्षक तेलाच्या थराला काढून टाकू शकतात. म्हणून आम्ही सहसा आठवड्यातून तीनदा केस धुण्याची शिफारस करतो. टाळूला कंडिशनर लावू नका. ते फक्त केसांचवर लागू करणे आवश्यक आहे

डॉ अनघा म्हणाल्या, अतिरिक्त तेल उत्पादनावर उपचार करण्यासाठी सॅलिसिलिक ॲसिड आणि टी ट्री ऑईल असलेले शॅम्पू वापरण्याची शिफारस केली जाते. शॅम्पूमधील कोरफडचे घटकदेखील टाळूच्या तेलकटपणाचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकते, पण वरील शिफारस केलेले शॅम्पू वापरूनही ते बरे होत नसल्यास औषधांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे उचित आहे.

निवडक



## विद्यार्थिनींचा निरोप समारंभ

**रोहे :** एम. बी. मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय रोहा येथे मंगळवारी रोजी तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थिनींच्या 'निरोप समारंभा'चे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर आणि वाणिज्य शाखेचे प्राध्यापक नरेश घाग यांनी मनोगतातून विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनींनी केली आणि सूत्रसंचालन प्रा. निकिता महाडिक यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच प्रथम आणि द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली.

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परिक्षेत आयुष शिंदे राज्यात प्रथम




**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे जानेवारी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परिक्षेत अलिबागच्या चिंतामणवराव केळकर विद्यालयातील इयत्ता चौथीचा विद्यार्थी आयुष दत्तात्रय शिंदे याने राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे २२ जानेवारी २०२३ रोजी इयत्ता चौथीची प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत आयुष शिंदे यांने ३०० पैकी २६४ गुण मिळवले. चिंतामणराव केळकर विद्यालयातर्फे आयुष शिंदे याचा बुधवारी (दि.२९) शाळेत सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे अध्यक्ष अमर वार्डे, सीईओ भावना केळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा पाटील, सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या वतीने आयुष शिंदे याला दहा हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येईल, असे यावेळी जाहीर करण्यात आले.

## अध्यक्षपदी राम मरवडे यांची निवड



**रोहे :** रोहा तालुका रास्त भाव अन्नधान्य दुकानदार संघटनेच्या माजी अध्यक्ष मोतीराम तेलंगे यांच्या अध्यक्षतेखाली रोहा शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या सभेत रोहा तालुका रास्त भाव अन्नधान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्षपदी राम मरवडे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी नवनिर्वाचित कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून रोहा तालुका रास्त भाव अन्नधान्य दुकानदार संघटनेच्या उपाध्यक्षपदी उद्देश वाडकर, सचिव अनिल बामुगडे, सहसचिव शरद झेमसे, खजिनदार संतोष दिवकर, विभाग प्रमुख पदी बिपिन गांधी, हिराजी शिंदे, प्रीती खांडेकर, संजय नाकती, विभा चोरगे, नरेश पाटील, धर्मा कोळी, विनीत जाधव, शरद शिंदे, अनंत वाघ, तानाजी दळवी, राजू गुजर प्रसिद्धी प्रमुख रघुनाथ कडू,किरण मोरे आदींची निवड करण्यात आली आहे.नवनिर्वाचित अध्यक्ष राम मरवडे यांच्या सर्व कार्यकारणीचे यावेळी अभिनंदन करण्यात आले.

# कर्जतमधील गरोदर महिलेची हेळसांड

## बाळ मृतावस्थेत जन्मले; आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाईची कुटुंबियांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत उपजिल्हा रुग्णालयामध्ये बाळंतपणासाठी दाखल झालेल्या आदिवासी महिलेवर येथे उपचार न करता तिला उल्हासनगर येथे पाठवून देण्यात आले. त्यामुळे गरोदर महिलेची हेळसांड होऊन तिचे बाळ मृतावस्थेत जन्माला आले. या प्रकरणाची जबाबदारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी झटकली आहे. दुसरीकडे दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी या पीडित कुटुंबियांनी केली आहे.

**मुख्यमंत्र्यांसह, आरोग्यमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांना पत्र**

या कुटुंबाने राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन आपल्यावर केलेल्या उपचाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, आपल्या बाळाच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी विठ्ठल पवार यांनी केली आहे.

२० मार्च रोजी कर्जत तालुक्यातील लाखाची वाडी येथील गरोदर महिला संगीता विठ्ठल पवार या बाळंतपणासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. कर्जत उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी केली आणि त्यांना आम्ही या ठिकाणी बाळंतपण करू शकत नाही, असे सांगून उल्हासनगर येथील रुग्णालयात जाण्यास सांगितल्याचे कुटुंबियांनी सांगितले. कर्जत उपजिल्हा रुग्णालयामधील रुग्णवाहिकेमधून त्यांना पाठवून देण्यात आले. सकाळी नऊ वाजता कर्जत उपजिल्हा रुग्णालयातून निघालेली रुग्णवाहिका उल्हानगर येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये बारा वाजण्याच्या सुमारास पोहोचली. तेथे संगीता पवार यांना असह्य कळा येत असतानादेखील रात्री आठ वाजेपर्यंत कोणतेही उपचार केले नाहीत, असा आरोप पवार कुटुंबियांनी केला आहे. उलट तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला पुढील रुग्णालयात न्यायला सांगितले, असे त्यांचे म्हणणे आहे.

**रुग्णालयाचा हलगर्जीपणा**

शेवटी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात संगीता पवार यांना रुग्णवाहिकेतून दाखल करण्यात आले. तेथे संगीता पवार यांचे बाळंतपण झाले, पण जन्मलेले बाळ हे मृत होते. शेवटी त्यांना (दि.२३) कळवा येथील रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आल्यावर हे कुटुंब आपल्या घरी कर्जत लाखाची वाडी येथे पोहोचले. त्यानंतर कडाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून एक आरोग्य सेविका आली. त्यांनी संगीता पवार यांची तपासणी न करता केस पेपर देऊन त्या निघून गेल्या. असे पवार यांनी सांगितले. पवार यांचे बाळंतपण करण्यात कर्जत उपजिल्हा रुग्णालय यांनी हलगर्जीपणा दाखवला. असा आरोप कुटुंबियांनी केला आहे.

## खोरा बंदरातील नवीन जेट्टीच्या बांधकामासाठी 'सॉईल टेस्टिंग'


**मुरुड : प्रतिनिधी**

खोरा बंदरात नवीन जेट्टी बनवण्यासाठी सॉईल टेस्टिंगच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. सॉईल टेस्टिंगद्वारे खोलगट भागात खडकाचे, दगडाचे व मातीचे प्रमाण काय आहे हे कळणार असून त्याद्वारे नवीन जेट्टीचे काम करणे सुलभ होणार आहे. ३० मीटर अंतरावर सॉईल टेस्टिंग करण्यात येणार आहे. असे पाच टप्पे करण्यात येणार असून त्याचा अहवाल प्रयोग शाळेत तपासून तो अहवाल सादर केला जाणार आहे.

**लवकरच कामाला सुरुवात होणार**

सॉईल टेस्टिंगच्या कामास किमान एक महिना जाणार आहे. तदनंतर अहवाल प्राप्त झाल्यावर नवीन जेट्टी चे बांधकाम प्रत्यक्षात ओक्टोम्बर २०२३ रोजी सुरु होणार आहे.त्यामुळे टेंडर होऊन सुद्धा किमान एक वर्ष अंतराने प्रत्यक्षात या कामाला सुरुवात होताना दिसत आहे.

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरात तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे नवीन जेट्टीची सुरुवात झाल्याने पर्यटकांना मोठा दिलासा प्राप्त झाला आहे.



## ग्रामस्थांसाठी विविध योजना राबविणार -सरपंच अनिल जाधव

### तांबाटी ग्रांमपंचायतच्या विकास कामांचा लोकार्पण सोहळा

**चौक : प्रतिनिधी**

ग्रामपंचायतचा सर्वांगिण विकास झाल्यानंतर ग्रामपंचायत आपल्या हद्दीतील विद्यार्थी यांच्यासाठी शैक्षणीक खर्च व ज्येष्ठ नागरीक यांच्यासाठी मोफत विविध योजना राबविणार असल्याचे सरपंच अनिल जाधव यांनी सांगितले.



खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी भव्य विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आयोजित केला होता. यावेळी महीला सभागृहाचे लोकार्पण, तांबाटी साकवाचे भूमिपूजन, डोणवत येथील शिवस्मारकाचे सुशोभीकरण कामाची सुरूवात करण्यात आली. ग्रामपंचायत हद्दीतील महिलांचा सन्मान व हळदीकुंकू समारंभ बरोबर होममिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करून महिलांना पैठणी साडी देण्याचा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग यांचा सन्मान, शिक्षक, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका मदतनीस यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी ग्रामस्थांच्यावतीने वेगवेगळ्या योजना आणने, त्या राबविणे, जनहिताची कामे मार्गी लावणे, पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे यासाठी सरपंच अनिल जाधव व ग्रामसेवक प्रशांत कदम यांचा सत्कार केला. तालुक्यातील तीन मजली कार्यालयाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. तेही पूर्ण करू असे ग्रामसेवक प्रशांत कदम यांनी सांगितले.

कार्यक्रमास सुनील पाटील, सुरेश बलकवडे, सुरेश पाटील, उपसरपंच जगदीश अवस्कर, जितेंद्र दळवी, सारिका लाड, शितल पाटील, निकेश जाधव, मेघा पाटील, स्नेहल गायकवाड,नितीन कदम, विठ्ठल वाघ, संगिता मेंघाल, अनिता चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य महिला उपस्थित होत्या.

# वीहूर पुलाच्या रस्त्याकडे बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

**मुरुड : प्रतिनिधी**

मुंबई मुरुड या मुख्य रस्त्याला जोडणारा वीहूर पूल अत्यंत महत्वाचा असताना सुध्दा केवळ तीनशे मीटर रस्त्याला कार्पेट टाकण्याचा विसर बांधकाम खात्यास पडल्याने आज असंख्य प्रवासी यांना धूळ व खाच खळग्यातून प्रवास करावा लागत आहे. २०२१ च्या मुसळधार पावसामुळे विहूर् पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे वाहून जाऊन येथे मोठ मोठे खड्डे पडले होते. स्थानिक पत्रकार यांनी पाठपुरावा केल्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूच्या संरक्षक भिंत काँक्रीटच्या बांधण्यासाठी लाखो रुपयांचा निधी प्राप्त झाला.



निधी प्राप्त होऊन एक वर्ष झाला असताना देखील संबंधित थेकेदार हा काम सुरू करीत नव्हता यावर खूप गदारोळ झाल्यावर ठेकेदाराने हे काम सुरू केले. सध्या वीहूर् पुलाच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता या संरक्षक लोखंडी पाईप बसवण्याचे काम शिल्लक आहे.

**पावसाळ्यानंतर रस्त्याचे काम करणार!**

याबाबत मुरुड येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे उपअभियंता गोरे याना याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले, विहूर पूल नवीन स्वरूपात बांधण्यात येणार आहे. हे काम पावसाळ्यानंतर सुरु होणार आहे. त्याचवेळी पुलाच्या आजुबाजुकडील सर्व रस्त्याचे बांधकाम करण्यात येणार असून कार्पेट सुद्धा करणार आहोत. आता येथे कोणताही खर्च करता येणार नाही.

मागील दोन वर्षापासून हे काम प्रलंबित राहिल्याने या पुलाच्या आजूबाजूकडील किमान तीनशे मीटरचा परिसर हा खड्डेमय झाला आहे.

या पुलाकडील सर्व बाजूने डांबरी कार्पेट मारणे खूप आवश्यक आहे. परंतु याकडे दुर्लक्ष झाल्याने असंख्य प्रवाशी यांना धूळ व खाच खळग्यातून प्रवास करावा लागत आहे. किमान तीनशे मीटरचे तरी कार्पेट डांबरीकरण करून असंख्य प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी बांधकाम खात्याकडे होत आहे.

मे अखेर पर्यंत कार्पेट न केल्यास पावसाळ्यात या पुलाजवळ मोठ मोठे खड्डे होऊन प्रवासी लोकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. तेव्हा बांधकाम खात्याने लवकरात लवर कार्पेट करावे अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

## पोलिसांसाठी कर्करोग तपासणी शिबीर

**खोपोली : प्रतिनिधी**

टाटा मेमोरियल सेंटर, कर्करोग प्रतिबंध विभाग, खोपोली यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात आणि जिल्ह्याच्या दुर्गम भागात तंबाखू विरोधी जनजागृती आणि कर्करोग प्रतिबंधासाठी गावपातळीवर कर्करोग पूर्व-तपासणी शिबिरांचे आयोजन केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील सर्व पोलीस बंधु-भगिनींची कर्करोग पूर्व-तपासणी करण्यात येत आहे.

अलिबाग मुख्यालय येथून सुरवात करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक उपविभाग पोलीस कार्यालय व त्याच्या अंतर्गत येणारे सर्व पोलीस स्टेशन यांच्या कर्मचाऱ्यांची टप्प्या-टप्प्याने तपासणी होणार आहे. याचे सर्व नियोजन स्वतः पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या नेतृत्वाखाली, जिल्हा पोलीस वेलफेअर ऑफिस यांच्या माध्यमातून होत आहे. शिबिरासाठी तालुक्यातील पोलीस अधिक्षकांना जबाबदारीं देण्यात आली आहे. या शिबिरामध्ये तोंडाचा कर्करोग, महिलांसाठी स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोग या तपासण्या प्रामुख्याने होणार आहेत. पोलीस सहकाऱ्यांसोबत त्यांच्या परिवारातील सदस्यांचीही तपासणी केली जात आहे. तपासणी शिबिरे यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटर मुंबई, कर्करोग प्रतिबंध विभाग खोपोलीच्या प्रमुख डॉ. प्रतिभा पाटील यांच्या नेतृत्वाखाली या विभागाचे वैद्यकीय समाजसेवक स्नेहल डी. के. व दिनेश मुसळे आणि सर्व सहकारी विशेष प्रयत्न करत आहेत.

# माडप रस्त्याची दयनीय अवस्था

## लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माडपच्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून स्थानिक लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप माजी सरपंच हरेश पाटील यांनी केला असून त्याबाबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना निवेदन दिले आहे.



खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माडप ही औद्योगिक विभागातील असून सावरोली खारपडा या मुख्य रस्त्यापासून माडप या गावात जाण्यासाठी अंदाजे दीड कि.मी. अंतर असून त्यापुढे शंभर घरांची ठाकूरवाडी आहे. त्यांची लोकसंख्या पाचशे पेक्षा जास्त आहे तर माडप गावची लोकसंख्या बाराशे पेक्षा जास्त आहे. गेली अनेक वर्षे या रस्त्याची कोणतीच डागडुजी करण्यात आली नाही. या गावा शेजारी मोठे गृह संकुल उभारण्याची योजना सुरू आहे. त्यांच्या बांधकाम साहित्याची ने आण याच मार्गावरून रात्रंदिवस होत असते. त्या वाहतुकीची देखील भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे या रस्त्याच्या वाईट अवस्थेत आणखी भर पडली आहे. येथून प्रवास करणे हे दुचाकी आणि रिक्षा यांना नकोसा झाला आहे. दुचाकी वरून जाणाऱ्या विद्यार्थी यांना पालकांनी जाण्यास मज्जाव केला आहे. गाव व त्या पुढील वाडी मोठी असल्याने हा रस्ता नेहमीच वर्दळीचा असतो. याची कायमस्वरुपी दुरूस्ती करावी अशी मागणी हरेश पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना भेटून निवेदन दिले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/५०२३/ प्र.क्र.०२,०३,०४/७३९/२०२३ — दिनांक : २९/०३/२०२३

**जाहीर ई-निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/Government Undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/138/2022-23 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे, सेक्टर-२१, प्लॉट नं.६२ येथे दैनिक बाजार बांधणे. | ५१,४१,८४५/- |
| २ | PMC/CE/139/2022-23 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली, सेक्टर-०५ प्लॉट नं.१० येथे दैनिक बाजार बांधणे. | ९२,५२,४६२/- |
| ३ | PMC/CE/140/2022-23 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली, सेक्टर-२१ प्लॉट नं. बी-५ येथे दैनिक बाजार बांधणे. | ५१,९६,३२०/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ३०/०३/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-14/ 2023-24 Dtd. 22.03.2023 **RFx No. 7000026795** | **Sub: Extension** for SRM E-Tender for the Work of attending emergency breakdown and planned maintenance activities of various 220 KV /100 KV EHV line under KTL S/Dn., Mahad under EHV(O&M) Dn., Mahad for the year 2023-24. . | Up to Rs. 25,00,000/- (Including GST+ 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the higher
**Tender Fee** will be the 500/- plus GST + 1% Labour Cess
**Bid Submission is From:** 22.03.2023 @ 00:00 Hrs to 28.03.2023 @ 23:59 Hrs for above tender & **Further Extended Up to** 05.04.2023 @ 23:59 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-13/ 2023-24 Dtd. 14.03.2023 **RFx No. 7000026431** | **Sub: Second Call** for SRM E-Tender for the Work of Providing various Consumable Materials at various Substations under EHV (O&M) Division, Mahad for FY 2023-24. | Up to Rs. 3,75,890/- (Including GST) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the higher
**Tender Fee** will be the 500/- plus GST.
**Bid Submission is From:** 30.03.2023 @ 00:00 Hrs to 05.04.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**

# खारघर परिसरात मध्यरात्रीनंतर वायू प्रदूषण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघर नोडच्या कडेला तळोजा एमआयडीसी वसलेली आहे. या एमआयडीसीतील केमिकल कंपन्यांमधून रात्रभर घातक वायू सोडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या धुरामुळे खारघरच्या रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

तळोजा एमआयडीसीतील काही कंपन्यांकडून रात्रीच्या वेळेस धूर सोडण्याचे प्रमाण वाढले आहे. या प्रकारामुळे खारघरमधील रहिवासी हैराण झाले असून रात्री १२ नंतर मोठ्या प्रमाणात धुराचे लोट हवेत पसरत असल्याने खिडक्या बंद करण्याची वेळ खारघरमधील रहिवाशांवर येत आहे.

हिवाळ्यात रात्रीच्या वेळेस सोडलेल्या धुराची लाट डोळ्यांना दिसेल इतकी होती, परंतु आता उन्हाळ्यातही



## दुषित हवेमुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात

एमआयडीसीतील कंपन्यांनी धूर सोडण्याचे सत्र सुरूच ठेवले आहे.

रात्री ११ नंतर खारघरमधील सेंट्रल पार्कपासून पुढील परिसरात डोळ्यांना दिसेल इतक्या अंतरावर धुराची चादर पसरत असल्याने मध्यरात्रीनंतर ते अगदी पहाटे ६ वाजेपर्यंत प्राणघातक वायूची लाट पसरल्याचे दिसत आहे. त्यामुळे रोज पहाटे चालायला घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना सर्दी, खोकल्याचा त्रास जाणवू लागल्याने अशा परिस्थितीत अनेकांना पहाटे घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.

पांढरेशुभ्र पाण्याचे फेसाळणारे धबधबे, दाट धुक्यात बुडालेले डोंगर, हिरव्या रंगाचा शालू पांघरलेले निसर्गसंपन्न खारघर पावसाळ्यात दिसतो. अगदी खारघर शहराच्या प्रवेशद्वारावर म्हणजे उत्सव चौकाच्या पाठीमागील डोंगरामुळे खारघरमध्ये प्रवेश केल्यावर गारेगार वाटायचे. हिंदी सिनेमात दाखवल्या जाणाऱ्या सुंदर निसर्गदृश्याचा भास खारघरमध्ये आल्यावर होत होता.

काही बड्या विकसकांकडून याच निसर्गाच्या धर्तीवर ग्रीन खारघर असे ब्रँडिंग करून स्वतःच्या आलिशान गृहप्रकल्पांच्या जाहिराती केल्या जात आहेत; मात्र वर्षभरात तळोजा एमआयडीसीतील कंपन्यांकडून होत असलेल्या प्रदूषणामुळे खारघरची प्रतिमा मलीन झाली आहे.

**खराब मासळीच्या दुर्गंधीप्रमाणे वास**

**महिनाभरापासून खारघरमधील सेक्टर ३०, २२, २५, ३५, ३६, ओवे गाव, पेठपाडा गाव, रांजनपाडा, इनामपुरी, मुर्बी, खुटूकबांधण, रोहिंजण, सत्यसाईबाबा ट्रस्ट हॉस्पिटल, आरएएफ भागात खराब मासळीला येणाऱ्या दुर्गंधीप्रमाणे वास येत आहे.**

**'एमपीसीबी'कडे कारवाईची मागणी**

**महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्ड (एमपीसीबी) संस्थेकडे प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक वारंवार करीत आहेत. प्रदूषणाबद्दल नागरिकांनी अनेक वेळा एमपीसीबीला सांगितले आहे.**

# नवी मुंबईत २ एप्रिलला वीर सावरकर गौरव यात्रा

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्याविषयी आजच्या पिढीला माहिती होण्यासाठी बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली बेलापूर पामबीच मार्ग ते वाशी शिवाजी चौकपर्यंत वीर सावरकर गौरव यात्रा काढण्यात येणार आहे, अशी माहिती नवी मुंबई भारतीय जनता पक्ष आणि बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) यांनी बेलापूर येथे आयोजित केलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत, महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, माजी विरोधी पक्षनेत्या सरोज पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख किशोर पाटकर, भाजप युवा उपाध्यक्ष पांडुरंग आमले उपस्थित होते.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून त्यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. तसेच त्यांची खासदारकी रद्द केली गेली. नंतर त्यांनी 'मी माफी मागणार नाही, मी गांधी आहे, सावरकर नाही', असे वक्तव्य केले होते. त्यावरून राज्यात पुन्हा सावरकर यांच्यावरून शाब्दिक चकमक घडत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यात 'स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर गौरव यात्रेची' घोषणा केली आहे.

याचाच एक भाग म्हणजे नवी मुंबईत ही गौरव यात्रा निघणार आहे. या गौरव यात्रेत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरील विविध पैलूंसह माहिती प्रदर्शनी दाखविली जाणार आहे. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे अभूतपूर्व योगदान समाजातील सर्व घटकांतील वर्गापर्यंत पोहचविण्याचे कार्य यानिमित्ताने होणार आहे.

राहुल गांधी यांनी सावरकर यांच्या विषयी केलेले वक्तव्य हे पोरकटपणाचे आहे. त्यांच्या घटक पक्षातही एकमत नाही. स्वतः शरद पवार यांना मध्यस्थी करावी लागत आहे. सावरकर यांच्या विषयी केलेले वक्तव्य अत्यंत दूषित असून तसेच आजच्या पिढीला सत्य परिस्थिती सांगण्यासाठी ही यात्रा काढण्यात येणार आहे, अशी माहिती आमदार मंदा म्हात्रे यांनी दिली.

बेलापूर विधानसभा क्षेत्रात निघणारी गौरव यात्रा ही महापालिकेसमोरील गोवर्धनी माता मंदिराच्या प्रवेशद्वारापासून निघणार असून ती पामबीच मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सावरकर यांच्या विषयी समग्र माहिती देण्यात आल्यावर यात्रेची सांगता होणार आहे.

# तळोजा कारागृहात मोबाईल फोनचा वापर

## आरोपीविरोधात गुन्हा दाखल

**तळोजा : रामप्रहर वृत्त**




तळोजा कारागृहात ऑक्टोबर २०२१ मध्ये सापडलेला मोबाईल फोन अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी घरफोडी प्रकरणात अटक केलेल्या विपुल चांबरिया (वय ३६) या आरोपीने बेकायदा तळोजा कारागृहात नेल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यामुळे खारघर पोलिसांनी विपुल चांबरियाविरोधात कारागृह कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

तळोजा कारागृहातील रुग्णालयात एका कैद्याने अवैधरीत्या मोबाईल फोन आणल्याची माहिती तुरुंग प्रशासनाला मिळाली होती. त्यामुळे तत्कालीन तुरुंग अधिकारी संदीप घुले यांनी ८ ऑक्टोबर २०२१ रोजी कारागृहातील रुग्णालयाची झडती घेतली होती.

या वेळी रुग्णालयातील एका कॉटखाली कपडीच्या पिशवीमध्ये मायक्रो कंपनीचा एक मोबाईल फोन सापडला होता. खारघर पोलिसांनी कारागृहात सापडलेल्या या मोबाईल फोनचा तांत्रिक तपास करून संपूर्ण माहिती काढली होती.

या तपासात अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्यात अटक केलेल्या तसेच सध्या तळोजा जेलमध्ये असलेल्या आरोपी विपुल चांबरिया याने मरोळ जे. बी. नगर येथे राहणारा त्याचा सहकारी संतोष राठोड (वय ३७) याला तीन वेळा संपर्क केल्याचे आढळून आले होते. त्यामुळे कारागृहाची सुरक्षा व्यवस्था भंग केल्याप्रकरणी पोलिसांनी विपुल चांबरियाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## मृतदेह आढळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आहे. पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ वर्षे असून त्याचा चेहरा गोल, अंगाने बारीक, डोकीचे केस बारीक काळे, दाढी मिशी वाढलेली व काळी, भुवया जाड, रंग सावळा असून डोक्याच्या दुखापतीने त्याचा मृत्यू झाला आहे. पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत असून या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीतील नवीन पोसरी येथील मंदिरात भगवान श्री नर्मदेश्वर शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात पार पडला. दोन दिवस सुरू असलेल्या धार्मिक सोहळ्याची सांगता सोमवारी हभप कृष्णा महाराज लांबे यांच्या कीर्तनाने झाली.



या वेळी आयोजित धार्मिक कार्यक्रमांत परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती. रविवारी दुपारी प्रधान संकल्प, शरीरशुद्धी, ग्रामदेवता आवाहन, गणपती पूजन, आचार्य वरण, स्थलशुद्धी, प्रसाद वास्तू मंडल, ब्रम्हादी मंडल, नवग्रह मंडल आवाहन, मूर्ती नगर प्रदक्षिणा, अग्नी स्थापना असे कार्यक्रम झाले तर सोमवारी सकाळी देवता पूजन, हवन, बलीदान, वास्तू निक्षेप, पूर्णाहुती, षोडषउपचार पूजा, मंदिराचे लोकार्पण आदी असे कार्यक्रम झाले.

# घणसोलीत खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी पदपथ व्यापला; कारवाईची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



शहरातील अनेक ठिकाणी रस्ते, चौक, बस स्थानके, रेल्वे स्थानक, पदपथांवर हातगाड्या, स्टॉल्स मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. विशेष म्हणजे या गाड्यांमुळे घणसोली विभागात कोंडीचा मोठा अडथळा निर्माण होत असून पालिकेच्या कारवाईला जुमानत नसल्याचे दिसत आहे.

घणसोली विभागात अगोदरच अस्ताव्यस्त लावलेल्या गाड्यांमुळे, बेकायदा पार्किंगमुळे रस्ते व्यापून गेले असताना विभागात रस्त्याच्या कडेला हातगाड्यांची संख्या वाढत चालली आहे. घणसोली स्टेशनलगत नेहमीच वर्दळ असते; मात्र या ठिकाणी बसणाऱ्या फेरीवाल्यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या पदपथांवर कब्जा केला असून अतिक्रमणामुळे कोंडी होऊ लागली आहे.

दरम्यान, या विक्रेत्यांवर कारवाईची मागणी नागरिकांमधून होत आहे.

**घणसोली विभागात बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई सुरू आहे. कारवाई केली तरी पुन्हा त्या ठिकाणी फेरीवाले बसतात.**

-संतोष शिलम, अतिक्रमण अधिकारी, महापालिका


## लोकलमधून दोन मोबाईलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे मार्गावर मोबाईल चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून दररोज चोरीचे गुन्हे घडत आहे. पनवेल रेल्वे मार्गावर अज्ञात चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या घटनेत दोन मोबाईलसह पाकीट चोरून नेल्याची घटना घडली आहे.

कामोठे येथील अभिजित कोरगावकर गोरेगाव वरून पनवेलला येत असताना चोरट्यांनी त्यांच्या खिशातील मोबाईल व पाकीट चोरून नेले. तर दुसऱ्या घटनेत घाटकोपर येथील तनुला गाढवे सानपाडा येथील कार्यालयात जाण्यासाठी लोकलने प्रवास करत असताना महिलांच्या डब्यात चोरट्यांनी त्यांच्या बॅगेतील मोबाईल पळवून नेला. याप्रकरणी रेल्वे पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. २९) सामंजस्य करार समिती व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनान्स (मुंबई) या दोन्ही संस्थेमध्ये सामाजिक करार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी डॉ. रवी गुप्ता (मुख्य विकास अधिकारी) हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट लिखित स्वरूपात एम.ओ.यू मधून दोन्ही संस्थेच्या ज्ञान व संसाधनांमध्ये आवश्यक योगदान देण्याची हमी देऊन करार हस्तांक्षरित करण्यात आला. या एम. ओ. यु. मधून महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींना व प्राध्यापकांना वेगवेगळे ट्रेनिंग प्रोग्रॅम व विविध कोर्सेस घेण्यात येतील, अशी हमी या वेळी दिली. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व सामंजस्य करार समितीच्या समन्वयक प्रा. नम्रता परीक, प्रा. रेवन शिंदे, प्रा. गायत्री काळे, प्रा. मोसमी लांबे व प्रा. डॉ. दीपिका हसीजा हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांची प्रशंसा केली. तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

# उरणमध्ये एकवीरा देवीची यात्रा उत्साहात

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



श्री आई एकवीरा देवीच्या जत्रा उत्सवाचे औचित्य साधून उरण तालुक्यातील मोरा बंदर, पिरकोन, कोप्रोली, म्हातवली, चिर्ले दुधेला डोंगर, वेश्वी, तसेच इंद्रायणी डोंगर चिरनेर- कळंबुसरे माथ्यावरील श्री एकवीरा देवीच्या मंदिरात भाविकांनी आप आपल्या कुटुंबासह दर्शनासाठी गर्दी केली होती.

या वेळी ये-जा करणाऱ्या भाविकांना देवीचे दर्शन सुलभ घेता यावे यासाठी तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचा लाभ घेता यावा यासाठी आर्यन ग्रुप चिर्ले तर्फे आयोजन करण्यात आले होते. चिर्ले गाव ते दुधेला डोंगर अशा प्रकारे आई एकवीरा देवीच्या पालखी सोहळ्याचे आयोजन ही आर्यन ग्रुप चिर्ले तर्फे करण्यात आले होते.



श्री आई एकवीरा देवीचे जागृत मंदिर कार्ला गडावर आहे. या मंदिरात भाविक आप आपल्या कुटुंबासह देवीच्या दर्शनासाठी दररोज हजारोंच्या संख्येने गर्दी करत असतात.

आगरी, कोळी, कराडी लोकांचे श्रध्दास्थान असलेले अशा लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री आई एकवीरा देवीचा जत्रा उत्सव हा मंगळवारी म्हणजे आईच्या वाराच्या दिवशी आल्याने भाविकांनी आपल्या लाडक्या आई एकवीराच्या दर्शनासाठी कार्ले गडावर मोठ्या संख्येने गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.

श्री आई एकवीरा देवीची मंदिरे उरण तालुक्यातील मोरा बंदर, पिरकोन, कोप्रोली म्हातवली, चिर्ले, दुधेला डोंगर, वेश्वी तसेच इंद्रायणी डोंगर चिरनेर-कळंबुसरे माथ्यावर आहेत.

या मंदिरात श्री आई एकवीरा देवीच्या जत्रा उत्सवाचे औचित्य साधून आई एकवीरा देवीच्या जत्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाविकांनी आई एकवीरा देवीच्या दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. या वेळी देवीची खणा नारळानी ओटी भरण्यासाठी तसेच केलेले नवस फेडण्यासाठी सुहासिनींची लगबग सुरू होती.

या जत्रा उत्सवाचे औचित्य साधून ग्रामस्थ तथा उत्सव कमिटीने सकाळी ठिक ५ वाजता श्री देवीच्या मूर्तीचे अभिषेक, विधिपूर्वक पुजा अर्चा ,काकड आरती त्यानंतर मंदिरात भजन, महाप्रसाद संध्याकाळी ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत गाव परिसरात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

## नवी मुंबई महापालिका शैक्षणिक शिष्यवृत्तीचे वितरण एप्रिलमध्ये

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबवण्यात आलेल्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेची पहिल्या टप्प्यातील रक्कम विद्यार्थ्यांच्या बँकेच्या खात्यावर लवकरच जमा होणार आहे, अशी माहिती आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली. पहिल्या टप्प्यात तीन हजार ७३३ विद्यार्थ्यांना तीन कोटींहून अधिक रक्कमेचे वितरण करण्यात येणार आहे.

अर्ज पडताळणीनंतर पालकांनी अंतिम टप्प्यात त्यांना येणारा ओ.टी.पी. सबमिट करण्याची अट काढून टाकण्यास आयुक्त राजेश नार्वेकर यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे अंतिम ओ.टी.पी. अभावी प्रलंबित राहिलेले सुमारे १० हजार अर्जही लवकरच संमत होतील. एप्रिल अखेर दोन्ही वर्षांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँकेच्या खात्यावर जमा होईल यादृष्टीने आमचे प्रयत्न चालू आहेत, असे अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी सांगितले.

शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०२१-२२ साठी ३४ हजार १९९, सन २०२२-२३ या वर्षासाठी ३७ हजार १६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. दोन वर्षांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी ३३ कोटी २५ लाख रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती समाज विकास विभागाचे उपायुक्त श्रीराम पवार यांनी दिली.

# खारघरमधील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ३५ परिसरात दोन शालेय मुलांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला होता. या प्रकारामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण असून पालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

पनवेल पालिका हद्दीतील मोकाट कुत्र्यांचे पालिकेकडून निर्बिजीकरण केले जाते; मात्र निर्बिजीकरणानंतरही कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढत आहे. खारघर परिसरात सध्या मोकाट कुत्र्यांची दहशत नागरिकांमध्ये आहे. परिसरातील रस्त्यांवर सायकल, दुचाकीवरून जाणाऱ्यांच्या मागे हे श्वान लागत असल्याने अनेकदा किरकोळ अपघाताच्या घटना घडल्या आहेत. अशातच दोन दिवसांपूर्वी खारघर सेक्टर ३५ मध्ये दोन शाळकरी मुलांवरदेखील कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे पालिकेने श्वान निर्बिजीकरणासाठी एका एजन्सीची नेमणूक केली आहे; मात्र निर्बिजीकरण पथक कधीही दृष्टीस पडत नसल्याचा आरोप खारघरवासीयांकडून केला जात आहे.


**खारघर सेक्टर ३५ रिलायन्स पॉइंट परिसरातील रस्त्यावर पंधरा ते वीस मोकाट कुत्र्यांचा कळप आहे. नुकताच या परिसरात दोन मुलांवर कुत्र्यांनी हल्ला केला होता. त्यामुळे पालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.**

**-संदेश करणे, पदाधिकारी, हार्मोनी सोसायटी**

**पनवेल पालिकेकडून श्वान निर्बिजीकरणासाठी पथक नेमण्यात आले आहे. खारघर परिसरात लवकरच कारवाई केली जाईल.**

**-डॉ. बी. एन. गीते, पनवेल महापालिका**

# मुबलक पाण्यासाठी नियोजनाची गरज



## रोहा तालुक्यात पाणी प्रश्न ऐरणीवर

**रोहे : प्रतिनिधी**

उन्हाळा आला की पाणीटंचाई या विषयावर चर्चा चालू होते, परंतु भविष्यातील पाणीटंचाई बाबत कोणतीही चर्चा होताना दिसत नाही. मुबलक पाणीसाठा असताना तो जतन करणे, पाणी आडवणे व जिरवणे याबाबत खल होताना दिसत नाही. अशीच काहीशी परिस्थिती रोहा तालुक्यातील आहे.

रोहा तालुक्यात उपलब्ध असलेला अथवा उपलब्ध होत असलेला पाणीसाठा कशा पद्धतीने जतन करता येईल यावर चर्चा होताना दिसत नाही. पाणी जतन करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले जात नाही. त्यामुळे भविष्यातील मुबलक पाण्यासाठी नियोजनाची गरज आहे; अन्यथा कोकणात दुष्काळ पाहण्यास मिळेल.

बारमाही वाहणारी कुंडलिका नदी, धो धो कोसळणारा पाऊस असे चित्र असताना तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील काही भागात उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. आज पाण्याची अवस्था अशी असेल तर भविष्यात भयानक परिस्थिती उद्‌भवू शकते. तालुक्यात मुबलक पाणी असताना प्रशासनाचा नियोजनशून्य कारभार व लोकप्रतिनिधींची उदासीनता यामुळे तालुक्यात पाण्याचा प्रश्न उन्हाळ्यात उद्‌भवत आहे. भविष्याच्या दृष्टिकोनातून शासन व लोकप्रतिनिधींनी एकत्रित काम करून पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

रोहा तालुक्यात पाण्याचे स्त्रोत मुबलक आहेत, पण त्याचा उपयोग होताना दिसत नाही. तालुक्यात पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असतो. सुतारवाडीचे धरण वगळता अन्य ठिकाणी पाणी साठविण्याची व्यवस्था नाही. म्हासाडी धरणाच्या रुपाने चणेरा विभागात पाण्याची व्यवस्था होऊ शकली असती, पण भूमिपूजन होऊनही एकही दगड संभवित धरणाच्या पायाला लावला गेला नाही. मध्यंतरीच्या काळात वनखाते व कृषी खात्याच्या माध्यमातून पाणी साठविण्यासाठी बंधारे बांधण्यात आले, परंतु गाळ काढण्यासाठी निधी नसल्याने हे छोटे बंधारे गाळात रुतले आहेत. दुसरीकडे लोकसहभागातून पाणी अडविण्यासाठी मोहीम हाती घेत बंधारे बांधण्यात आले. हे बंधारे आज दुर्लक्षित झाले आहेत.

वाशी, लांडर, तळाघर, बोरघर, निवी, वर्षे भुवनेश्वर, रोहा नगर परिषद यांना कारीवणे येथून पाणीसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ शकतो. कारीवणे येथे बंधारे बांधण्यात आले. जलपूजन करण्यात आले. पुढे काय हा प्रश्न अद्याप सुटला नाही. पूर्वी भुवनेश्वरच्या माथ्यावरुन पाणी भुवनेश्वरवासीयांना मिळत होते. कालांतराने या स्त्रोताकडे दुर्लक्ष झाले. महत्त्वाचे म्हणजे दोन्ही स्त्रोतांचे पाणी मोफत मिळणार होते, परंतु लोकप्रतिनिधींची अनास्था पहावयास मिळाली.

तालुक्यात पाण्यासाठी कुंडलिका नदी सर्वांत मोठा पाण्याचा स्त्रोत होता. निती आयोगानेसुद्धा कुंडलिका नदीची दखल घेतली होती. आज ही नदी एमआयडीसीतील सांडपाणी, नगर परिषद ते ग्रामपंचायतीमधील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाली आहे. यावर स्थानिक लोकप्रतिनिधी बोलण्यास तयार नाही.

पाण्यासाठी सर्वांत जास्त त्रास पडम ते दापोली या गावांतील नागरिकांना उन्हाळ्यात होतो. त्यांना तात्पुरते पर्याय नको, तर कायमस्वरुपी नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

तालुक्यातील शहर व गावांचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्त्रोत यांचा अभ्यास केल्यास लोकप्रतिनिधी व शासनाशी नागरिकांच्या व तज्ज्ञ लोकांच्या सहकार्याने ठोस नियोजन करण्याची आवश्यकता आहे. रोहा पंचायत समितीच्या वतीने दरवर्षी फेब्रुवारी, मार्च, एप्रिल महिन्यात संभाव्य पाणीटंचाई भासू शकेल अशा गावांचा आराखडा तयार केला जातो, पण पाणी जतन करण्यासाठी शासनाकडे कोणताही पाठपुरावा केला जात नाही हे वास्तव आहे.

### ■ कालव्याला पाणी नाही

*पूर्वी कालवे प्रवाहित असल्याने वापरण्यास कालव्यांचे पाणी मिळत होते. महत्वाचे म्हणजे गावातील विहिरी व तलाव पाण्याने भरत असत, पण आता कालवा कोरडा आहेच, शिवाय गावात विहिरी, तलावही दिसत नाहीत. शहरातील बहुतांशी विहीरी वाढत्या नागरीकरणाने लोप पावत आहेत. या वर्षी कालव्यातील पाणी येण्यासाठी ग्रामस्थांनी आंदोलने केली, निवेदन दिले, मात्र मार्च महिना संपत असतानाही अद्याप कालव्याला पाणी आले नाही. कालव्याचे काम मात्र युद्धपातळीवर सुरू असल्याचे दिसून येते.*

# भित्तीचित्रांमुळे पेणच्या सौंदर्यात भर

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत पालिकेचा उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरामध्ये माझी वसुंधरा अभियान २०२३ अंतर्गत शहरातील भिंतीवर तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या उड्डाणपुलावरदेखील उत्तम अशी रंगीत छायाचित्रे काढण्यात आली असून या छायाचित्रांमधून पेणची संपन्नता अधोरेखित करण्यात आली आहे.

या रंगीबेरंगी चित्रामधून स्वच्छतेचे महत्त्व तसेच पेण शहरामध्ये असणारे मैदान, तलाव, क्रांतिकारक तसेच बाप्पाचे रेखीव चित्र रेखाटण्यात आल्याने या भिंती बोलक्या होऊन शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकारी अंकिता इसाळ, शिवाजी चव्हाण आदींसह कर्मचारी हे अभियान राबवित आहेत.

याबाबत जीवन पाटील यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, पेण शहर हे ऐतिहासिक शहर असून माझी वसुंधरा अभियान २०२३ अंतर्गत आम्ही वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. त्याचाच हा एक भाग असून पेण शहरातील पर्यटनस्थळे तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम यासारखे चित्र रंगवून पर्यटकांनादेखील आकर्षित करण्याचा मानस आहे. त्याचबरोबर जनजागृती व्हावी म्हणून आम्ही स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे स्लोगनदेखील पेन्टींग केलेले आहेत. या चित्रांमुळे कळत-नकळत पेण शहराच्या संपन्नतेत वाढ झालेली आहे.




(छाया : अनिस मनियार)




(छाया : महादेव सरसंबे)

रोहा : तालुक्यातील खारगाव येथील पालखी व महादेवाची काठी वाजतगाजत महादेव वाडीत घेऊन जाताना ग्रामस्थ.

# पेणमध्ये रस्त्याच्या निधीसाठी ग्रामस्थांचे निवेदन



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील जिर्णे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ताडमाळ व तुरमाळ या आदिवासी वाड्यांना रस्त्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी ५ एप्रिलला लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला असून याबाबत एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांना निवेदन देण्यात आले.

जिर्णे ग्रामपंचायतीच्या हद्दीत ताडमाळ, तुरमाळ, पहिरमाळ, गुतीचीवाडी, चाफेगणी या महसूली आदिवासी वाड्या येत असून तेथील आदिवासींना ये-जा करण्यासाठी रस्त्याची उपलब्धता नाही. गेली दोन वर्ष या आदिवासी वाड्या अर्ज व विनवण्या करीत आहेत, पण त्यांच्या रस्त्याच्या मागणीकडे दुर्लक्ष होत आहे. २६ ऑक्टोबर २०२१ व २१ फेब्रुवारी २०२२ रोजी एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांना ताडमाळ या कातकरीवाडीला रस्त्यासाठी निधी उपलब्ध व्हावे म्हणून निवेदन दिले होते. त्यानंतर जिर्णे ग्रामपंचायतीने १ डिसेंबर २०२२ तसेच ताडमाळ, कातकरीवाडीच्या ग्रामस्थानी ११ फेब्रुवारी २०२३ रोजी अर्ज दिला. गेली दोन वर्षे ताडमाळ ग्रामस्थ निधी मिळावा म्हणून पाठपुरावा करीत आहेत तसेच जिर्णे ग्रामपंचायतीकडूनदेखील कार्यक्षेत्रात येणाऱ्या ताडमाळ आणि तुरमाळच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून पत्रव्यवहार होत आहे, मात्र निधी उपलब्ध होत नसल्याने एकात्मिक आदिवासी प्रकल्प पेणच्या कार्यालयाला आदिवासी बांधव-भगिनींच्या शिष्ट मंडळाने भेट देउन निवेदन दिले. युद्धपातळीवर ताडमाळ आणि तुरमाळ या आदिवासी वाड्यांना रस्त्यासाठी निधी उपलब्ध झाला नाही, तर ५ एप्रिल २०२३ रोजी लाक्षणिक उपोषणाचा इशारा एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांना दिला.

प्रकल्प अधिकाऱ्यांनी शिष्टमंडळाची बाजू ऐकूण ताडमाळ आणि तुरमाळ या दोन्ही आदिवासीवाड्यांना जाण्यासाठी ठक्कर बाप्पा या योजनेतून निधीची उपलब्धता करून देतो असे सांगितले तसेच १ तारखेनंतर या रस्त्याची पाहणी करण्यासाठी कार्यालयीन निरीक्षकांना पाठवितो आणि या वाड्यांची किती लोकसंख्या आहे त्यानुसार निधीची उपलब्धता करून देतो असे सांगितले. ५ तारखेच्या अगोदर जर निरिक्षक पाहणी करण्यासाठी आले नाही तर ५ एप्रिल रोजी आम्ही उपोषणाचा घेतलेला निर्णय मागे घेणार नाहीत, असे आदिवासींनी सांगितले. या वेळी दोन्ही आदिवासी वाड्या मिळून मोठ्या संख्येने महिला व पुरूष उपस्थित होते.

# माणगावात राम नवमी शोभायात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे गुरुवारी (दि. ३०) श्री राम नवमीनिमित्त शोभायात्रेचे आयोजन श्री रामनवमी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या शोभायात्रेत सर्व धर्मप्रेमींनी बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन आहे.

राम नवमी शोभायात्रेला गुरुवारी दुपारी ३.३० वाजता सुरुवात होणार असून ही शोभायात्रा साई मंदिर, आदर्श समतानगर, कचेरी रोड, बाजारपेठ बालाजी कॉम्प्लेक्स माणगाव अशी काढण्यात येऊन सोनभैरव मंदिर खांदाड या ठिकाणी तिची सांगता होईल. यानंतर सायंकाळी ७.३० वाजता श्री राम मंदिर येथे आरती होणार असून रात्री ८ वाजता सोनभैरव मंदिर या ठिकाणी महाप्रसाद देण्यात येईल.

या राम नवमी उत्सवाची माणगावात जय्यत तयारी करण्यात आली असून बाजारपेठेत ठिकठिकाणी कमानी उभारून अनेक ठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत.

# माणगाव तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना अध्यक्ष सलीम शेख यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत पुरस्कार जाहीर केले.

यंदा जे. बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे कार्यवाह नानासाहेब सावंत यांना शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार, रामनारायण मिश्रा यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार, पंचायत समितीच्या माजी सभापती संगीता बक्कम यांना आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्कार, डॉ. तुषार शेठ यांना वैद्यकीय सेवा पुरस्कार, मनोहर मेहता यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार, महाडचे राकेश शहा यांना तरुण उद्योजक पुरस्कार, तळेगावचे सरपंच निलेश म्हात्रे यांना आदर्श सरपंच पुरस्कार, मोर्बा येथील इकबाल हर्णेकर यांना सेवाभावी कार्यकर्ता पुरस्कार, मांजरवणेचे अ. जलील फिरफिरे यांना आदर्श पोलीस पाटील पुरस्कार, माणगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड यांना प्रशासकीय सेवा पुरस्कार, सचिन देसाई व प्रभाकर मसुरे यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार, कोस्ते येथील संचिता मोरे यांना आदर्श महिला सरपंच पुरस्कार, निजामपूरचे महेश शिर्के यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, माणगाव टीएमसी कॉलेजचे प्रा. हर्शल जोशी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, निवास साबळे यांना कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस पुरस्कार, मारुती चाटे यांना आदर्श तलाठी पुरस्कार, राकेश मोरे यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार, इम्रान धवलारकार यांना देवदूत पुरस्कार, अभिनंदन दळवी यांना क्रीडा क्षेत्रातील पुरस्कार तसेच समाजात उल्लेखनीय कार्य करणारे मंगल चंद्रकांत मेहता, नितीन बाळकृष्ण मेहता, निलेश चंद्रकांत मेथा, कांतीलाल मेथा, दीपक गोविंद गायकवाड आदींना गौरविण्यात येणार आहे.

या बैठकीला पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष मजिद हाजीते, सल्लागार विजय मेथा, ज्येष्ठ पत्रकार सचिन देसाई, प्रभाकर मसुरे, सहसचिव स्वप्ना साळुंके, सदस्य दीपक दपके आदी उपस्थित होते.

पुरस्कारांचे वितरण व सत्कार समारंभ माणगाव कुणबी भवन हॉलमध्ये २ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या भव्य-दिव्य अशा कार्यक्रमात शिवसेना उपनेते तथा पक्षप्रतोद आ. भरतशेठ गोगावले यांच्याहस्ते व माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. तरी या सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघातर्फे करण्यात आले आहे.

# कला उत्सवाला कर्जतकरांचा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रोटरी क्लबने उत्कर्ष इव्हेंट्सच्या सहकार्याने मराठमोळा बहारदार नजराणा कला उत्सव २०२३ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा आनंद कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लुटला. कलाकारांनी सादर केलेल्या विविध कलांनी उपस्थितांची मने जिंकली.

रोटरी क्लब कर्जतच्या वतीने येथील रॉयल गार्डनच्या लॉनवर झालेल्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन श्रीफळ वाढवून करण्यात आले. अध्यक्ष सतीश श्रीखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमास जय मल्हार मालिका फेम बानू अर्थात अभिनेत्री ईशा केसकर, इंडियन आयडल मराठी उपविजेता गायक जगदीश चव्हाण, महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम अभिनेते हेमंत पाटील व कुणाल मेश्राम, लावण्यवती नृत्यांगना आकांक्षा कदम, निवेदक अरुण अहिरे आदी उपस्थित होते.




(छाया : विजय मांडे)

स्टेप आर्ट डान्स ग्रुपच्या माध्यमातून गणरायाला वंदन करून मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. अभिनेत्री ईशा केसकरने प्रथमच कर्जतमध्ये कला उत्सवाच्या माध्यमातून कर्जत रोटरी क्लबच्या आमंत्रणाला साथ देत उपस्थिती लावून प्रेक्षकांचा आनंद द्विगुणीत केला. नृत्यांगना आकांक्षा कदम यांनी लावणीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या अदा सादर करीत उपस्थितांचे लक्ष केंद्रित केले. गायक जगदीश चव्हाण यांच्या आवाजाची जादू कर्जतकरांना अनुभवायला मिळाली. महाराष्ट्राच्या हास्य जत्रा फेम अभिनेते हेमंत पाटील आणि कुणाल मेश्राम यांनी प्रेक्षकांना चांगलेच हसवले. निवेदक अरुण अहिरे यांनी आपल्या गोड वक्तृत्वाने अनेकांची मन जिंकली. या कार्यक्रमाला कर्जतकरांनी भरभरुन प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नगरसेवक ॲड. संकेत भासे, रोटरी असिस्टंट गव्हर्नर अविनाश कोळी, भाजपचे किरण ठाकरे, हेमंत ठाणगे, सागर तवळे, संदीप ठाकरे, डॉ. मिलिंद सोनावणे, पंकज पाटील, बळवंत घुमरे, साईनाथ श्रीखंडे, अर्चना बैलमारे, विशाल शहा, अरविंद जैन, डॉ. प्रेमचंद जैन, दिपचंद जैन, जितेंद्र ओसवाल, सचिन ओसवाल, योगेश राठी, अभिषेक सुर्वे, सुनील सोनी, हुसेन जमाली, रामदास घरत, जितेंद्र परमार, नंदन भडसावळे, डॉ. आदित्य जंगम, डॉ. बी. एल. पाटील, सुशांत ठकेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आनंद व्यक्त केला.

# हनुमान मंदिर जीर्णोद्धार सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील मुरावाडी गावात श्री हनुमान मंदिर जीर्णोद्धारासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुरावाडी येथे सुंदर आणि भव्य असे श्री हनुमान मंदिराचे बांधकाम झालेले आहे. त्याचा जीर्णोद्धार, कळशारोहण व सभामंडपाचे लोकार्पण सोहळ्याचे आयोजन २९ व ३० मार्च या कालावधीत केले जाणार आहे.

या वेळी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम मंदिरात होणार आहेत. यामध्ये २९ मार्च रोजी कळशारोहण, यज्ञ, होम, दुपारी महाप्रसाद, रात्री भजन व जागर होणार आहे, तर ३० मार्चला श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन, तीर्थप्रसाद व महाप्रसाद देण्यात येईल. सायंकाळी विविध देणगीदार व मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. रात्री ९ वाजता कीर्तनकार हभप किरण महाराज भागवत (पुणे, शिरूर) यांचे कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सुरक्षाविषयक चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

**मुरूड : प्रतिनिधी**

दिघी पोर्ट लिमिटेड आयोजित राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह कार्यक्रमांतर्गत अब्दुल सत्तार अंतुले हायस्कूलमध्ये दिघी पोर्ट सुरक्षा विभाग आणि अदानी फाऊंडेशनच्या वतीने सुरक्षाविषयक चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विजेत्या विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक बक्षीस वितरण करण्यात आले.

या वेळी उपस्थित सर्वांना पर्यावरण व सुरक्षा विभागाचे विलास शिर्के, संरक्षण विभागाचे प्रमुख कर्नल अरविंदसिंह बेदी यांनी संकट व आणीबाणीच्या वेळी घ्यावयाची सुरक्षा, काळजी याबद्दल माहिती दिली. सोबतच मरीन कंट्रोल रूम, आपत्कालीन सुरक्षा विभाग, बंदर प्रबंधन, अग्निशमन सुरक्षा याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. अदानी फाउंडेशनच्या जयश्री काळे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक माहिती व संधी याबद्दल मार्गदर्शन केले. आठ विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर दिघी बंदरातील विविध विभाग व त्यांची माहिती क्षेत्रभेटी अंतर्गत सर्वांना देण्यात आली.

पोर्टमधील विविध विभागांचे कामकाज व त्याबद्दल प्रत्यक्ष भेटीद्वारे माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमास दिघी पोर्टचे अधिकारी, कर्मचारी संघटनेचे नेते सूरज मांजरेकर व सदस्य, मुख्याध्यापक अशोक पडवळ व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राजकुमार कोलथळकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असा उपक्रम आयोजित करून क्षेत्र अभ्यासाबाबत पोर्टमध्ये संधी दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.



# भारतीय फुटबॉल संघाला तिरंगी स्पर्धेचे विजेतेपद



**इम्फाळ : वृत्तसंस्था**

संदेश झिंगन आणि कर्णधार सुनील छेत्री यांच्या गोलमुळे भारताने मंगळवारी येथे किर्गिस्तानचा २-० असा पराभव केला. त्याचबरोबर तीन देशांची आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा जिंकली. बुधवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने म्यानमारवर १-० असा विजय मिळवला होता. किर्गिझस्तान प्रजासत्ताकने शनिवारी स्पर्धेतील त्यांच्या दुसऱ्या सामन्यात म्यानमारविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधली होती. त्यामुळे त्यांना स्पर्धा जिंकण्यासाठी फक्त ड्रॉची गरज होती.

झिंगानने सामन्याच्या ३४व्या मिनिटाला पहिला गोल करीत भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर स्टार खेळाडू आणि कर्णधार छेत्रीने ८४व्या मिनिटाला गोल करीत आघाडी दुप्पट केली.

मिडफिल्डर ब्रँडन फर्नांडिसने प्रतिस्पर्ध्याच्या गोलसमोर फ्री-किक मारली आणि झिंगनने वेगवान चाल करून चेंडू गोलपोस्टच्या पुढे जाऊन भारताला पुढे नेले. किर्गिझ प्रजासत्ताकचा गोलरक्षक तोकोताएव एरझानला वाटले की, उंच भारतीय बचावपटू झिंगान हेडरसाठी जाईल, पण तो चुकीचा सिद्ध झाला. झिंगानने चेंडू खाली येण्याची वाट पाहिली आणि नंतर चतुराईने तो गोलपोस्टमध्ये टाकला.

## झिंगनसह कर्णधार छेत्रीची कमाल

भारतीय प्रशिक्षक इगोर स्टिमॅक सहा बदलांसह सामन्यात उतरले, पण त्याचा संघाच्या लयीवर परिणाम झाला नाही. पुढील वर्षी जानेवारीत एएफसी आशियाई चषक स्पर्धा होणार आहे. या तयारीसाठी आयोजित या स्पर्धेत उपखंडीय आव्हानासाठी सज्ज असल्याचे भारतीय खेळाडूंनी दाखवून दिले.

### छेत्रीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ८५वा गोल

भारताने जेव्हा-जेव्हा संधी मिळेल, तेव्हा आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवला. त्याचा फायदा ८४व्या मिनिटाला संघाला झाला. पेनल्टी बॉक्समध्ये डेव्हिडोव्ह निकोलाईने नौरेम महेश सिंगला फाऊल केल्याने, भारताला पेनल्टी देण्यात आली. छेत्रीने या पेनल्टीचे रूपांतर गोलमध्ये केले. त्याचा आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा ८५वा गोल होता.

# कर्णधार रोहित शर्माने मानले मुंबई इंडियन्सचे आभार

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्माने इंडियन प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून कार्यभार स्वीकारल्याला आयपीएल २०२३मध्ये दहा वर्षे पूर्ण होत आहेत आणि या दहा वर्षांत तो पाच विजेतेपदांसह स्पर्धेतील सर्वात यशस्वी कर्णधार आहे. आयपीएलच्या १६व्या पर्वाला सुरुवात होण्यापूर्वी रोहितने फ्रँचायझीसोबत त्याच्या दीर्घ प्रवासाबद्दल सांगितले आणि या सहवासातील प्रत्येक क्षण आवडता असल्याचे त्याने म्हटले.

१० वर्ष हा मोठा काळ आहे. साहजिकच १० वर्षांत तुम्ही खूप आठवणी निर्माण करता. त्यातला प्रत्येक क्षण मी नक्कीच एन्जॉय केला आहे. तुम्ही मला एखादी आवडती आठवण सांगायला सांगितल्यास, मी ते करू शकणार नाही कारण ते कठीण आहे, असे रोहित म्हणाला.

२०११च्या मोसमात पहिल्यांदा मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात एक तरुण खेळाडू म्हणून सामील झाल्यानंतर, रोहितने पाच विजेतेपदात संघाचे नेतृत्व केले आहे. २०१३च्या स्पर्धेत त्याने कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतली आणि पहिल्याच वर्षात संघाला विजेतेपद मिळवून दिले. गेल्या काही वर्षांत आम्ही खूप चांगले क्रिकेट खेळलो आहोत. या संघासोबतचा माझा अनुभव अभूतपूर्व आहे. या संघाने मला प्रथम खेळाडू म्हणून



आणि नंतर कर्णधार म्हणून स्वतःचे कौशल्य दाखवण्याची आणि व्यक्त होण्याची उत्तम संधी दिली आहे. एक व्यक्ती म्हणून आणि या संघाचा एक कर्णधार म्हणून माझ्यात नक्कीच प्रगती झाली आहे. मुंबई इंडियन्सने मला स्वतःला वेगळ्या अवतारात दाखवण्याची एक उत्तम संधी दिली आहे, फ्रँचायझीसोबतच्या त्याच्या दीर्घ आणि यशस्वी नात्याबद्दल बोलताना रोहित म्हणाला.

आम्ही स्थानिक, देशांतर्गत भारतीय खेळाडूंचा खेळ फारसा पाहिलेला नसतो. म्हणूनच यातील काही खेळाडूंना खेळ समजून घेण्यासाठी आम्ही प्री-सीझन कॅम्प आयोजित करतो. नवीन नियमांची सांगड घालण्यासाठी आणि तुमच्या सर्वोत्तम खेळाडूंना मैदानावर उतरवण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

# कॅरम स्पर्धेत अमित वाडकर प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

श्री साबाई माता क्लबच्या माध्यमातून कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी खालापूर, कर्जत तालुक्यातील कॅरम प्रेमी उपस्थित राहून आपले कौशल्य दाखविले. स्पर्धेत खोपोली येथील अमित वाडकर प्रथम क्रमांक पटकाविला.



(छाया : विनायक माडपे)

या स्पर्धेचे अनावरण उमेश गावंड यांच्या हस्ते करण्यात आले. ३२ कॅरम खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेत खोपोली येथील अमित वाडकर प्रथम तर खालापूरमधील अमित यादव यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तसेच तृतीय क्रमांक कृष्णा वाघमारे कर्जत तर चतुर्थ क्रमांक एजाज मुजावर रसायनी यांनी पटकाविले.

स्पर्धेसाठी अमित यादव, राजू देसाई, योगेश करंजकर, अनिल चाळके, गणेश लोहार, सौरभ मुळेकर आदींनी मेहनत घेतली. स्पर्धेसाठी क्रीडारसिकही उपस्थित होते.

# दिल्ली कॅपिटल्समध्ये अभिषेक पोरेल करणार यष्टीरक्षण

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १६वा हंगाम सुरू होण्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या कॅम्पमधून मोठी बातमी समोर आली आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी ऋषभ पंतच्या बदली खेळाडूची घोषणा करण्यात आली आहे. ऋषभ पंतच्या जागी बंगालचा यष्टीरक्षक फलंदाज अभिषेक पोरेलचा संघात समावेश करण्यात आला आहे. दिल्ली कॅपिटल्सचा नियमित कर्णधार ऋषभ पंत सध्या कार अपघातात झालेल्या दुखापतीतून सावरत आहे. त्याच्या जागी संघाने आगामी हंगामासाठी डेव्हिड वॉर्नरची कर्णधारपदी निवड केली आहे, तर अक्षर पटेलला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.

बंगालचा यष्टिरक्षक फलंदाज अभिषेक पोरेलने देशांतर्गत



क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. पीटीआयच्या मते, तो आयपीएल २०२३मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना दिसणार आहे. तो संघात ऋषभ पंतच्या जागा घेईल. २१ वर्षीय पोरेलने १६ प्रथम श्रेणी सामने, तीन लिस्ट ए सामने आणि तीन टी-२० सामने खेळले आहेत. डाव्या हाताच्या फलंदाजाने फेब्रुवारी २०२३मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने ३०.२१च्या सरासरीने ६९५ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ६ अर्धशतके झळकावली आहेत.

पोरेलने रणजी ट्रॉफीमध्ये बंगालसाठी चांगली कामगिरी केली होती. त्याने ग्रुप स्टेजमध्ये हरियाणाविरुद्ध ४९ धावा केल्या होत्या. उपांत्य फेरीत मध्य प्रदेशविरुद्ध ५१ आणि अंतिम फेरीत सौराष्ट्रविरुद्ध ५० धावा केल्या होत्या. पीटीआयच्या रिपोर्टरनुसार, पोरेलने सराव सामन्यात चांगली कामगिरी केली आहे.

# पाच वर्षांनी होणार आयपीएल रंगारंग उद्घाटन सोहळा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३चा नवीन ब्लॉकबस्टर सीझन ३१ मार्चपासून सुरू होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गतविजेत्या गुजरात टायटन्सची लढत महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्जशी होणार आहे. या सामन्यापूर्वी उद्घाटन समारंभ आयोजित केला जाईल.

जवळपास तीन वर्षांनंतर आयपीएलमध्ये होम आणि अवे फॉरमॅटचे पुनरागमन होत आहे. आयपीएलचा थरार सुमारे ७४ दिवस चालणार आहे. अहमदाबादमध्ये १.२५ लाखांहून अधिक लोकांसाठी बसण्याची



व्यवस्था आहे. रिपोर्ट्सनुसार, रश्मिका मंदान्ना आणि तमन्ना भाटिया आयपीएल २०२३च्या उद्घाटन समारंभात परफॉर्म करू शकतात. यासोबतच कलाकारांच्या यादीत कतरिना कैफ, टायगर श्रॉफ आणि अरिजित सिंग यांचीही नावे आहेत. हिप-हॉप गायक एपी ढिल्लोनव्यतिरिक्त, अभिनेत्री कियारा अडवाणी आणि क्रिती सेनन यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकतील.

# ‘सीएसके’ने लॉन्च केली नवी जर्सी



**चेन्नई : वृत्तसंस्था**

जगातील सर्वात मोठी क्रिकेट लीग आयपीएलचा १६वा हंगाम ३१ मार्चपासून सुरू होत आहे. या स्पर्धेसाठी सर्व संघ सज्ज असून जोरदार सराव करीत आहेत. दरवर्षी आयपीएलमध्ये संघाच्या जर्सीबद्दल चाहत्यांना प्रचंड उत्सुकता असते. या वर्षी आतापर्यंत सर्व संघांनी आपली जर्सी लॉन्च केली आहे. सीएसकेनेही बुधवारी (दि. २९) आपली जर्सी लॉन्च केली आहे.

चेन्नई सुपर किंग्जने इंडियन प्रीमियर लीगच्या १६व्या हंगामासाठी बुधवारी त्यांची जर्सी लॉन्च केली आहे. या कार्यक्रमात संघाचा कर्णधार एमएस धोनी, बेन स्टोक्ससह इतर सर्व खेळाडू उपस्थित होते. व्यवस्थापनाने सर्व खेळाडूंना त्यांच्या जर्सी दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन चेन्नईमध्ये करण्यात आले होते.

सीएसके संघात सामील झालेला अनुभवी खेळाडू अजिंक्य रहाणेकडे कर्णधार धोनीने आपली जर्सी सुपूर्द केली. कर्णधाराव्यतिरिक्त, संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशिक्षक यांनी इतर खेळाडूंच्या जर्सींचे वाटप केले. संघात प्रथमच समाविष्ट झालेल्या अष्टपैलू बेन स्टोक्सला ५५ क्रमांकाची जर्सी देण्यात आली.

# चिंतामणराव केळकर विद्यालयात उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

चिंतामणराव केळकर विद्यालय चेंढरे येथे क्रिकेट अ‍ॅकॅडमी सुरू करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून या अकॅडमीमध्ये उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिर सुरू होणार आहे. शिबिरात सर्वांना प्रवेश देण्यात येणार आहे.



या अ‍ॅकॅडमीमध्ये सरावासाठी तीन खेळपट्टया तयार करण्यात आल्या आहेत. गोलंदाजीचे यंत्र बसविण्यात आले आहे. या गोलंदाजीच्या यंत्रामध्ये ताशी १०० किमी वेगापर्यंत गोलंदाजी करण्याची सुविधा आहे. अशा प्रकारची सुविधा देणारी चिंतामणराव केळकर विद्यालय ही आलिबाग तालुक्यातील पहिली शाळा आहे. या ठिकाणी मुलांसाठी व मुलींसाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अधिकृत प्रशिक्षक प्रशिक्षण देण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.

१ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिरात सर्वांना प्रवेश देण्यात येणार आहे. या क्रिकेट प्रशिक्षण शिबिरात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी चिंतामणराव केळकर विद्यालय चेंढरे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अभिनव स्पोर्ट्स क्लब आयोजित कबड्डी स्पर्धा

# श्री साई क्लब, जय दत्तगुरु, शताब्दी स्पोर्ट्स, आकांक्षा यांची विजयी सलामी



**मुंबई : प्रतिनिधी**

माटुंगा (पूर्व) येथील नप्पू लखमशी मनोरंजन मैदानावर अभिनव स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेत श्री साई क्लब, जय दत्तगुरु, शताब्दी स्पोर्ट्स, आकांक्षा यांनी विजयी सलामी दिली.

उद्घाटनीय सामन्यात श्री साई क्लबने चुरशीच्या सामन्यात यंग विजयला ३२-३० असे चकवीत आगेकूच केली. मध्यांतराला १३-१६ अशा तीन गुणांनी पिछाडीवर पडलेल्या श्री साईने नंतर मात्र जोरदार आक्रमण करीत विजय खेचून आणला. प्रज्वल पाटील, समीर शेख यांच्या चढाई-पकडीच्या भन्नाट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. यश बेळणेकर, अथर्व गुरव यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात कमी पडला.

जय दत्तगुरुने श्रीराम क्रीडा विश्वस्तचा ४०-२८ असा सहज पाडाव केला. विश्रांतीला २३-१० अशी आघाडी घेणाऱ्या जय दत्तगुरुने नंतर सावध खेळ करीत विजय साकारला. ओमकार पाटील, साईल सारंग जय दत्तगुरु कडून, तर पवन पाठक, देव शर्मा श्रीराम कडून उत्कृष्ट खेळले. इतर दोन्ही सामने अगदीच एकतर्फी झाले. त्यात शताब्दीने शिवनेरीला २९-१२, तर आकांक्षाने डॉ. आंबेडकरचा ३३-१६ असा पराभव करीत आगेकूच केली.

**तृतीय श्रेणी संक्षिप्त निकाल**

**१) संघर्ष मंडळ वि.वि. शिवतांडव(३७-२०)**
**२) गुरू माऊली स्पोर्ट्स वि. वि. श्री हनुमान सेवा (४५-१३)**
**३) शिवनेरी स्पोर्ट्स वि.वि. रणझुंजार (२९-१४).**

# फुटबॉल संघटनेच्या मुख्य कार्यालयात मेस्सीचा पुतळा



**दक्षिण अमेरिका : वृत्तसंस्था**

मागच्या वर्षी झालेल्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाने फ्रान्सचा पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव केला. मेस्सीच्या कामगिरीमुळे अर्जेंटिनाने ३६ वर्षांनी फुटबॉल विश्वकरंडकावर आपले नाव कोरले. त्याचा सन्मान म्हणून दक्षिण अमेरिका फुटबॉल संघटनेच्या मुख्य कार्यालयात आता ब्राझीलचे दिग्गज खेळाडू पेले आणि अर्जेंटिनाचे मॅरेडॉना याच्या शेजारी आता मेस्सीचा पुतळा उभा करण्यात आला आहे. मेस्सीच्या या पुतळ्याच्या हातात विश्वकरंडकाची प्रतिकृतीसुद्धा आहे.

मेस्सीच्या पुतळ्याचे सोमवारी उद्घाटन करण्यात आले. या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना मेस्सी म्हणाला, मी लहानपणापासूनच फुटबॉल खेळायचे स्वप्न बघितले होते. मला फुटबॉल खेळायला आवडते आणि याच आवडीमुळे मी माझ्या देशासाठी विश्वकरंडक जिंकू शकलो आहे. माझ्या कारकिर्दीत अनेक चढ-उतार आले, परंतु मेहनत घेणे सोडले नसल्यामुळे मी स्वप्नांचा पाठलाग करू शकलो. पुतळा उभा करून माझा सन्मान करण्यात आला, याचा मला अत्यंत आनंद आहे आणि याला मी माझा सन्मान समजतो.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com